POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-२५९ ● मुंबई, सोमवार, २१ एप्रिल २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

महाराष्ट्राच्या राजकारणातील सर्वात मोठा प्रश्न!
खरचं राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येणार का?

■मुंबई। प्रतिनिधी :

राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येणार अशा चर्चा मागील अनेक वर्षांपासून सुरु आहेत. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंनी केलेल्या विधानानंतर ते पुन्हा एकत्र येणार अशा चर्चा रंगू लागल्या आहेत. मात्र, यावेळी दोन्ही बंधू खरंच एकत्र येणार का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे पुन्हा एकत्र येणार असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. या चचेचं कारण आहे, राज ठाकरेंनी उद्धव ठाकरेंना दिलेली टाळी आणि त्यानंतर उद्धव ठाकरेंनी देखील त्यावर प्रतिक्रिया दिली आहे. महाराष्ट्रासाठी आमच्यातील भांडणं दूर ठेवण्यासाठी तयार असल्याचं दोन्ही ठाकरेंनी म्हटलंय. ठाकरे बंधू एकत्र येणार अशी सुरु झालेली चर्चा नेहमीसारखी हवा तर नाही असा प्रश्न देखील उपस्थित होत आहे. कारण याआधी देखील मनसे आणि शिवसेनेची युतीसंदर्भात चर्चा झाली मात्र, काही कारणांवरुन ही युती फिस्कटली होती.

ठाकरे बंधूमध्ये युतीची चर्चा कधीकधी झाली?

- २७ नोव्हेंबर १००५ रोजी राज ठाकरे यांनी शिवसेना सोडली आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची स्थापना राज ठाकरेंनी केली. २००९ मध्ये लोकसभा निवडणुकीनंतर 'सामना'मधून उद्धव ठाकरेंची टाळी युतीच्या चर्चा वृत्तपत्रांमधून होत नसतात म्हणत राज ठाकरेंनी इन्कार केला होता. २०१४ विधानसभेपूर्वी शिवसेना आणि भाजपची युती तुटल्यानंतर उद्धव ठाकरेंनी युतीसाठी राज ठाकरेंना फोन केला होता. असा मनसे नेत्यांचा दावा आहे.
- २०१७मध्ये महापालिका निवडणुकीवेळीही युतीची चर्चा रंगली होती. श्रीधर पाटणकरांशी चचाहीं सुरू झाल्याचा मनसेचा दावा पुढं ही चर्चा अचानक थांबली. २०१७मध्ये युतीची चर्चा झाली होती, नंतर उद्धव ठाकरेंनी फोन घेतले नाही. २०१४ विधानसभेपूर्वी भाजप आणि शिवसेनेची युती तुटल्यानंतर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरेंमध्ये युतीची चर्चा झाली होती. मात्र, ऐनवेळी दोन्ही पक्षांमध्ये युती झाली नाही. यावर मनसे आणि शिवसेना नेत्यांनी वेळोवेळी आपआपली मतंही व्यक्त केली आहेत
- राज ठाकरेंनी शिवसेना सोडत मनसेची स्थापन केली. त्यानंतर दोन्ही बंधू एकत्र येणार अशी चर्चा मागील २० वर्षापासून सुरुय. मात्र, अजूनही दोन्ही बंधू एकत्र आले नाहीत. मात्र, आता राज ठाकरेंनी टाळी दिल्यानंतर उद्धव ठाकरेंनी देखील प्रतिसाद दिलाय. त्यामुळे राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येणार का? की नेहमीसारखी यावेळी देखील चचेर्ची हवाच आहे. हे पाहणं आता महत्त्वाचं आहे.

महाराष्ट्रात सुरुय नशेची शेती!
गांजाचं रॅकेट... पोलीस मुळापर्यंत कधी पोहोचणार?

■मुंबई। प्रतिनिधी :

कोल्हापूर जिल्ह्यात शेतात गांजा पिकवणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या वाढत चालली असल्याचे चित्र आहे. कोल्हापूर स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने जिल्ह्यामध्ये दुसरी कारवाई करत शेतात पिकवलेला १५ किलो गांजा जप्त केला आहे. गेल्या काही दिवसांपासून राज्यभरातच गांजाची शेती होत असल्याचं उघड झालंय.

४ दिवसांपूर्वी कोल्हापूर पोलिसांनी कागल तालुक्यातील मद्याळ गावात शेतामध्ये लावलेला २१ किलो गांजा जप्त करून ७५ वर्षीय शेतकरी दिनकर कृष्णा राणेला अटक केली होती. गांजाची शेती करणं कायद्याने गुन्हा असतानाही या शेतकऱ्यानी गांजाची शेती करून हा गांजा कुणाला पुरवला, याची पाळंमुळं कोल्हापूर पोलीस खोदून काढत आहेत.

कोल्हापुरात आत्तापर्यंत झालेल्या कारवायांमध्ये गांजाची परराज्यातून तस्करी होत असल्याचं समोर आलंय..पण आता जिल्ह्यातच दोन शेतकरी गांजाची शेती करत असल्याचं समोर आल्यानं जिल्ह्यात सापडणारा गांजा जिल्ह्यातच पिकवला जातोय का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. कोल्हापूर पोलीस दलानं अमली पदार्थांविरोधात जोरदार कारवाई सुरू केलीय. वर्षभरात जवळपास ९९ लाख रुपयांच्या अमली पदार्थांचा मुद्देमाल जप्त केलाय.

पोलिसांकडून सुरू असलेल्या कारवाईचं नागरिकांनी स्वागत केलंय...पण आता शेतकरीच गांजा पीकवू लागल्यामुळे पोलिसांसमोर मोठं आव्हान निर्माण झालंय. पोलिसांनी आतापर्यंत ८० हून जणांना ताब्यात घेतलंय. यातून गांजाचं रॅकेट कसं चालतंय? या पाठीमागे कोण आहे..याची उत्तरं कोल्हापूर पोलिसांनी शोधून काढून मुळापर्यंत पोहचायला हवं.

गेल्या काही दिवसात राज्यभरात गांजाची शेती करण्याचं प्रमाण वाढलंय. ऊसाच्या पिकात दिसणारं गांजाचं पीक दिसू लागलंय. गांजा पिकविणं कायद्यानं गुन्हा असतानाही कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक ऊस उत्पादक शेतकरी ऊसामध्ये गांजाची लागवड केल्याचं पोलीस तपासात उघड झालंय. जिल्ह्यातील करवीर तालुक्यातील वाशी ते शेळकेवाडी रस्त्याला लागून असणाऱ्या शेतामध्ये ४२ वर्षीय शेतकरी जयदीप शेळके हा गांजा शेती करत असल्याची माहिती कोल्हापूर पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी शेताच्या मध्यभागी पिकवलेला १५ किलो गांजा जप्त केलाय.

तुमची भाची साक्षी या जगात... बीडमधील पीडित मुलीच्या आईचं एकनाथ शिंदेंना पत्र, छेडछाडीतून तरुणीची आत्महत्या

■बीड। प्रतिनिधी :

बीडमध्ये गुन्हेगारीच्या घटना सातत्याने घडत आहेत. त्यातच आता छेडछाड आणि ब्लॅकमेलिंगला कंटाळून बीडच्या एका तरुणीने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. साक्षी कांबळे असे आत्महत्या केलेल्या तरुणीचे नाव आहे. ती केएसके महाविद्यालयात शिक्षण घेत होती. तिने १४ मार्च रोजी मामाच्या घरात गळफास घेत आत्महत्या केली. या घटनेला एक महिना पूर्ण झाला असून तिचे कुटुंब अजूनही न्यायाच्या प्रतीक्षेत आहे. आता यासंदर्भात साक्षीच्या आईने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना पत्र लिहिले आहे. यात त्यांनी न्यायाच्या प्रतीक्षेत असल्याचे पाहायला मिळत आहे.

''साहेब, मी तुमची लाडकी बहीण.. तुम्ही मुख्यमंत्री झाला आणि राज्यातील अस्वस्थ झालेल्या बहिणींना आधार मिळाला. आपण मुख्यमंत्री असताना आपल्या म्हणजेच आम्हासारख्या अगणित बहिणींना भावाचा बंध मिळाला. मी नाराज आहे. आज आपण उपमुख्यमंत्री आहात. मात्र माझ्यासाठी तुम्हीच लाडक्या बहिणीचे मुख्यमंत्री आहात. आज आम्हाला तुमची कमतरता भासते. माझी मुलगी साक्षी तिला हवाई सुंदरी व्हायचे होते. मात्र एका क्षणात ती नाहीशी झाली. काही मुलांनी तिची छेड काढली आणि साहेब तुमच्येा लाडक्या बहिणीच्या मुलीने गळफास घेऊन जीवन संपवले. साहेब आम्ही आस धरुन आहोत. तुमची भाची साक्षी या जगात परत येणार नाही, हे आम्हाला देखील माहिती आहे. मात्र त्या क्रूर नराधमांना देखील तेवढी शिक्षा होणे अपेक्षित आहे'', असे साक्षीच्या आईने दिलेल्या पत्रात नमूद केलं आहे.

नेमकं काय घडलं?

साक्षीच्या आईने दिलेल्या माहितीनुसार, आज २० एप्रिल रोजी मुलीचे लग्न होणार होतं, पण त्याआधीच छेडछाडीला कंटाळून माज्या मुलीने आत्महत्या केली. अभिषेक कदम आणि १० ते १२ मुलांची एक टोळी आहे. ही टोळी मुलींना फसवतात, त्यांचे फोटो काढतात अन् ब्लॅकमेल करतात. हे एक प्रकारे रॅकेट आहे. यामध्ये दोन मुलींचाही समावेश आहे. अभिषेक कदम याच्यावर मकोका लावावा अन् कायमचा जेलमध्ये टाकावा, अशी संतप्त प्रतिक्रिया पीडित मुलीच्या आईने दिली.

महाराष्ट्रात नवीन धरण बांधणार
मुंबईकरांसाठी ३१०५००००००० रुपयांचा महाप्रकल्प

■मुंबई। प्रतिनिधी :

महाराष्ट्रात भीषण पाणी टंचाई निर्माण झाली आहे. अनेक जिल्ह्यांमध्ये टँकरद्वारे पाणी पुरवठा सुरु आहे. अशातच आता महाराष्ट्रात नविन धरण बांधले जाणार आहे. खास मुंबईकरांसाठी हे नवीन धरण बांधण्यात येत आहे. मुंबई महानगरपालिकेचा हा ३१०५००००००० रुपयांचा महाप्रकल्प आहे. मुंबईवरील पाणीबाणी सोडवण्यासाठी प्रस्तावित असलेल्या गारगाई धरण प्रकल्पाला अखेर राज्य मंत्रिमंडळाकडून हिरवा कंदील देण्यात आला आहे. या प्रकल्पासाठी लागणाऱ्या वन्यजीव आणि पर्यावरण विषयक बाबींना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंजुरी दिलीय. यामुळे येत्या काळात मुंबईकरांना अधिकचा पाणीपुरवठा होणार आहे. मुंबईतील वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध व्हावा म्हणून पालघरच्या वाडा तालुक्यातील ओंगदे गावाजवळ गारगाई धरण उभारण्यात येणार आहे. तानसा अभयारण्य लगत असलेल्या धरणाची पाणी साठवणूक क्षमता सहा टीएमसी इतकी असून या धरणातून मुंबईकरांना दररोज ४४० एम एल डी म्हणजेच आता मिळणाऱ्या पाण्याच्या अकरा टक्के अधिक पाणी मिळणार आहे.

मुंबईला पाणीपुरवठा करणार पालघर आणि ठाण्यातील सहावं तर बीएमसीचं स्वतःचं चौथ धरण असेल . हे धरण उभारण्यासाठी १२५० कोटी रुपये तर संपूर्ण प्रकल्पासाठी ३१०५ कोटी रुपये खर्च केला जाणार आहेत . मुंबईसह राज्यातील विविध भागात पाणी प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. मुंबईतील पाणी प्रश्नावरून शिवसेना ठाकरे गटाने आक्रमक भूमिका घेतलीय. पालिका विभागीय कार्यालयावर ठाकरे गटाकडून हंडा मोर्चा काढण्यात आले. ठाकरे गटाचे नेते अनिल परब आणि आमदार वरून सरदेसाई आदी नेते मोर्चात सहभागी झाले होते.

'लाडक्या दाजींनाही कर्जमुक्त करा'
आश्वासनांचं भूत आता महायुतीच्या मानगुटीवर?

■मुंबई। प्रतिनिधी :

लाडक्या बहिणींनंतर आता लाडक्या दाजींनाही कर्जमुक्त करा असा टोला खासदार अमोल कोल्हेंनी लगावला.. त्यानंतर कर्जमाफीच्या मुद्यावरुन विरोधकांनी पुन्हा महायुती सरकारला घेरलंय.

महायुतीचं सरकार सत्तेत येऊन ५ महिने उलटून गेलेत. मात्र महायुतीनं जाहीरनाम्यात दिलेलं शेतकरी कर्जमाफीचं आश्वासन अजून पूर्णत्वास गेलेलं नाही. उलट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अर्थमंत्री अजित पवारांपासून कृषीमंत्री माणिकराव कोकाटेंनी कर्जमाफीचा निर्णय लांबणार असल्याचीच वक्तव्य आजवर केलीयत. आता पुन्हा एकदा याच कर्जमाफीच्या मुद्दयावरुन विरोधकांनी महायुती सरकारला घेरलंय. लाडक्या बहिणींची तर काळजी घ्या मात्र लाडक्या दाजींना दिलेलं कर्जमाफीचे आश्वासन पूर्ण करा असा टोला राष्ट्रवादी शरद पवार गटाचे खासदार अमोल कोल्हे यांनी लगावलाय.

दुसरीकडे नाशकात झालेल्या शिवसेना ठाकरे गटाच्या मेळाव्यात उद्धव ठाकरेंनीही महायुतीला त्यांच्या जाहीरनाम्यातल्या आश्वासनांची आठवण करुन दिली. महायुतीनं जाहीरनाम्यात थापा मारल्याचा आरोपच ठाकरेंनी केला. मागच्या सरकारमध्ये महायुतीसोबत असलेले बच्चू कडूंचे महायुतीसोबतचे संबंध कडू झाले आणि ते महायुतीतून बाहेर पडले. मात्र आता त्याच बच्चू कडूंनी शेतकरी कर्जमाफीसह शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी २८ तारखेला आंदोलनाची हाक दिलीय आणि महायुतीला शिंगावर घेतलंय.

लाडकी बहीण योजना, शेतकरी कर्जमाफीसारख्या आश्वासनांच्या जोरावर महायुतीचं सरकार सत्तेत आलं. मात्र सरकारी तिजोरीत खडखडाट असल्यानं कर्जमाफीवरुन सरकार टोलवाटोलवी करतंय. तर शेतकऱ्यांनाही कर्जमाफीसाठी न थांबता हप्ते बरा असं स्वतः अर्थमंत्री अजित पवार सांगताहेत. त्यामुळं ज्या आश्वासनांच्या जोरावर सत्तेत आले त्या आश्वासनांचं भूत आता महायुतीच्या मानगुटीवर बसलंय. आणि ते भूत सध्या विरोधकांच्या तोंडून प्रश्न विचारून महायुतीच्या विक्रमाला बेजार करु लागलंय.

नाशिक जिल्ह्यातच शरद जोशी प्रणित शेतकरी संघटनेनं शासन विरोधी जोरदार आंदोलन करत विधानसभा निवडणुकीतील जाहीरनाम्याची होळी केली. सरकारला त्यांच्याच आश्वासनांची आठवण करुन देत आंदोलकांनी संताप व्यक्त केला.

स्टंटबाजीच्या नादात वर्दी गमावली! बीडमधील वादग्रस्त ढरकरणजीत कासलेचे खळबळ कारनामे

■बीड। प्रतिनिधी :

आपल्याया वाल्मिक कराडच्या एन्टाऊंटरची आफर होती अशा दावा करत राज्यात खळबळ उडवून देणारा निलंबीत पीएसआय रणजीत कासलेला पोलिसांना ताब्यात घेतलंय. तर संभाजीनगर परिक्षेत्राच्या विशेष पोलीस महानिरीक्षकांनी कासलेवर बडतर्फीची कारवाई केली आहे. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३११(२)(ब) अंतर्गत त्याला सेवेतून बडतर्फ करण्यात आलंय. सोशल मीडियावर केलेली स्टंटबाजी रणजीत कासलेला भोवली आहे.

आधी बीडमधील पोलीस अधिकाऱ्यांवर गंभीर आरोप, त्यानंतर फेक एन्टाऊंटरचा आरोप, धनंजय मुंडेंवर आरोप आणि वाल्मिकच्या एन्टाऊंटच्या सुपारीचा आरोप.. असे खळबळजनक आरोप करत रणजीत कासले प्रकाश झोतात आला होता.

सुरतच्या व्यापाऱ्याची फसवणूक केल्याप्रकरणाचा तपास कासलेकडे होता. तपासाठी गेल्यानंतर आर्थिक व्यवहार झाल्याचा कासलेवर ठपका आहे. पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्याकडे तक्रार आल्यावर कासलेवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. २६ मार्चला रणजीत कासले निलंबित झाले. रणजीत कासले लातूरचा रहिवासी आहे.

कुत्राही निवडून येतो असं म्हणत मागास जातीवर लातूरमध्ये कासलेने वादग्रस्त वक्तव्य केले आहे. बीडच्या भगवान कांडेकर यांनी शिवाजीनगर पोलिसांत तक्रार दिली होती. १४ एप्रिलला कासलेविरोधात शिवाजीनगर पोलिसांत गुन्हा दाखल झाला. अनुसूचित जाती-जमाती प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल झाला आहे.

१७ एप्रिलला कासलेला सेवेतून बडतर्फ केले. छत्रपती संभाजीनगरच्या पोलीस महानिरीक्षकांनी कासलेवर कारवाई केली. रणजीत कासलेला पुण्यातून अटक करण्यात आली. कासले सध्या बीड पोलिसांच्या ताब्यात आहे. रणजीत कासलेची चौकशीची मागणी केली जात आहे. मात्र, कासलेंवर किती भरोसो ठेवायचा असा सवाल ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी उपस्थित केलाय. तर कासलेंनी केलेल्या आरोपांची चौकशी केली जाईल. मात्र असा व्यक्तिंच्या आरोपांना किती महत्व द्यायचं हे पाहणंही महत्वाचं असल्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटलंय.

धनंजय मुंडे, वाल्मिक कराड आणि बीड पोलीसांवर आरोपांच्या बॉम्ब टाकणारा रणजीत कासलेला बडतर्फ करण्यात आलंय.. तो सध्या पोलिसांच्या ताब्यात आहे.. त्यामुळे त्याने केलेल्या आरोपांची चौकशी होणार का हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

महिलेल्या पोट, गुप्तांगावर जबर मारहाण
आशा वर्करला राग अनावर झाला अन्...

■अमरावती। प्रतिनिधी:

गर्भवती महिलेची घर, समाजाकडूनही काळजी घेतली जाते. आशा वर्करही यामध्ये महिलांना मदत करत असतात. पण आशा वर्करच गर्भवती महिलेच्या जीवावर उठत असेल तर? असाच एक धक्कादायक प्रकार समोर आलाय. एका किरकोळ वादातून आशा वर्करने गर्भवती महिलेवर हल्ला केल्याचा प्रकार समोर आलाय.

घर बांधकामाच्या किरकोळ वादावरून आशा वर्कर आणि गर्भवती महिलेचा वाद झाला. यानंतर संतप्त आशा वर्करने गर्भवती महिलेच्या पोटावर आणि गुप्तांगावर जबर मारहाण केली. यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली. हा प्रकार इतका धक्कादायक होता की या मारहाणीत गर्भवती महिलेचे दातही पाडले आहे.

अमरावती जिल्ह्यातील अतिदुर्गम मेळघाटातील चिखलदरा तालुक्यातील डोमा येथील ही घटना आहे. या घटनेनंतर गर्भवती महिलेसह तिच्या पतीलाही लाकडी काठीने जोरदार मारहाण करण्यात आली. या घटनेत गर्भवती महिलेचा पतीदेखील गंभीर जखमी झाला. गर्भवती महिलेवर आणि तिच्या जखमी पतीवर चूरणी येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

चिखलदरा पोलिसात तक्रार दाखल झाल्यानंतर चिखलदरा पोलिसांनी मारहाण करणाऱ्या आशा वर्कर आणि तिच्या पतीला ताब्यात घेतले आहे. मात्र गर्भवती महिलांची काळजी घेण्यासाठी नियुक्त असलेल्या आशा वर्कर कडूनच गर्भवती महिलांना अशा प्रकारची मारहाण होत असेल तर मेळघाट्यातील आदिवासी महिलांनी कोणावर विश्वास ठेवायचा? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

ससून रुग्णालयाचा चौकशी अहवालात डॉक्टर

■पुणे। प्रतिनिधी :

गर्भवती तनिषा भिसे यांच्या मृत्यूप्रकरणात पुण्याचं दीनानाथ मंगेशकर रुग्णालय वादात सापडलं होतं. तर डॉक्टर सुश्रूत घैसास यांनी या प्रकरणात राजीनामा दिला होता. तनिषा भिसे प्रकरणात ससून रुग्णालयाचा चौकशी अहवालातून रुग्णालय आणि डॉक्टरला क्लीन चिट देण्यात आली आहे. रुग्णालय आणि डॉ घैसास यांच्यावर कारवाई करण्याची मागणी जोरदार सुरू होती. मात्र आता मंगेशकर रुग्णालय आणि डॉक्टर घैसास यांना दिलासा मिळालाय. ससून रुग्णालयाच्या वैद्यकीय समितीनं ६ पानांचा अहवाल पुणे पोलिसांना सादर केलाय. यामध्ये डॉक्टर सुश्रुत घैसास यांना क्लीन चिट मिळालीय तर मंगेशकर रुग्णालयावरही ठपका ठेवलेला नाही. त्यामुळे ससून रुग्णालयाच्या अवहालानंतर आश्चर्य व्यक्त केलं जात आहे. तनिषा भिसे मृत्यू प्रकरणात ससून रुग्णालयाच्या समितीने दिलेला अहवाल अर्धवट असल्याचं वक्तव्य भाजप आमदार अमित गोरखे यांनी केलंय. पूर्ण अहवाल येईल तेव्हा नक्कीच दोषींवर गुन्हे दाखल होतील असा विश्वास गोरखे यांनी व्यक्त केलाय. दीनानाथ रुग्णालयाला वाचवण्याचा प्रयत्न सुरू आहे.. याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करणार असल्याचं राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे नेते प्रशांत जगताप यांनी म्हटलंय. तर ससूनच्या अहवालासह आतापर्यंत आलेल्या तीनही अहवालांनुसार दोषींवर कठोर कारवाई करण्याचं आश्वासन यावेळी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिलंय. तनिषा भिसे मृत्यू प्रकरमातील दोषींवर कारवाई करण्याची मागणी राज्यभरातून करण्यात येतेय. पुण्यात याबाबत अनेक आंदोलनंही झाली. मात्र ससूनच्या अहवालात मंगेशकर रुग्णालय आणि डॉक्टर घैसास यांना क्लिनचीट दिल्यानं आश्चर्य व्यक्त केलं जातंय. मग तनिषा भिसे मृत्यू प्रकरणात दोषी कोण असाही सवाल विचारला जात आहे.

संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

बीएमसीवर कंट्रोल कुणाचा?

राज्याचे अपर मुख्य सचिव (गृह) इकबालसिंह चहल यांनी नुकतीच मुंबई महापालिकेच्या मुख्यालयात शहराच्या पायाभूत सुविधांशी संबंधित विविध विषयांवर आढावा बैठक घेतली. या बैठकीला मुंबई महापालिकेचे आयुक्त भूषण गगराणी यांच्यासह महापालिका, एमएमआरडीए, म्हाडा, एसआरएतील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. चहल यांना एकाएकी अशी बैठक घेण्याची गरज का पडली किंवा कुणाच्या आदेशाने त्यांनी ही बैठक घेतली असा प्रश्न या बैठकीपूर्वी अनेकांना पडला होता. परंतु इकबाल सिंह चहल यांची मुंबईचे पालक सचिव म्हणून नियुक्ती झाल्याचे समजताच अनेकांच्या चेहऱ्यावर आश्चर्यमिश्रीत भाव उमटले. प्रोटोकॉलनुसार महापालिका आयुक्तांनी बैठक आयोजित केल्यावर संबंधित प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना महापालिका मुख्यालयात येणे बंधनकारक आहे. मात्र इकबाल चहल यांना मंत्रालयात बैठक घेण्याचे अधिकार असूनही त्यांनी महापालिका मुख्यालयात ही बैठक घेतली. समन्वयकाच्या नावाखाली चहल यांना आणत मुंबई महापालिका प्रशासनावरील एकनाथ शिंदे यांचा कंट्रोल कमी करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही खेळी खेळल्याचे बोलले जाते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ताब्यात नगरविकास, गृहनिर्माण खात्यासह मुंबई शहराचे पालकमंत्रीपदही आहे. त्यामुळेच एकनाथ शिंदे यांच्या अखत्यारीत असलेल्या विभागातील कामाची झाडाझडती करण्याची छुपी खेळी फडणवीस यांनी खेळल्याची राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे. विधानसभा निवडणुकीप्रमाणेच आगामी मुंबई महापालिकेतही यश मिळावे, म्हणून एकनाथ शिंदे यांची शिवसेना प्रयत्नशील आहे. त्या दृष्टीने शिंदे गटाकडून जोरदार जुळवाजुळवी-पळवापळवी जे काही शक्य आहे ते सर्व सुरू आहे. शिवसेनेतील फुटीनंतर दोन्ही गटांनी आधी लोकसभा आणि त्यानंतर विधानसभेतील संख्याबळ वाढवण्याकडे प्रामुख्याने लक्ष दिले होते. विधानसभेत ठाकरे गटाने गटांगळ्या खाल्ल्या तर शिंदे गटाचा डंका वाजला. तेव्हापासून ठाणे जिल्ह्यातील माजी नगरसेवकांसह आता मुंबईतील माजी नगरसेवकही एकापाठोपाठ एक करत शिंदे गटात दाखल होण्यासाठी रांगेत उभे आहेत. मागील दोन वर्षांत शिंदे गटाने मुंबई महापालिका क्षेत्रात ठाकरे गटाला ठिकठिकाणी खिंडार पाडत आपले नेटवर्क मजबूत केले आहे. ठाणे जिल्ह्यात एकनाथ शिंदे यांचे आधीपासूनच एकहाती वर्चस्व आहे, ठाण्याच्या बालेकिल्ल्याला कुठलाही धोका नसल्यानेच एकनाथ शिंदेंनी मुंबईचे पालकमंत्रीपद हाती घेत शहरातील संघटनबांधणीकडे लक्ष देण्याचे ठरवले होते, ज्यात त्यांना आतापर्यंत बऱ्यापैकी यश मिळालेले आहे आणि हेच यश सध्या भाजपच्या डोळ्यात खुपत आहे. याआधी एकसंध शिवसेनेसोबत युतीने निवडणूक लढवताना भाजपला नेहमीच दुय्यम भूमिकेत रहावे लागत होते. परंतु शिवसेनेतील फुटीनंतर भाजपने मुंबई महापालिकेवर भगवा फडकवण्याचा निर्धार पक्का केला आहे. मुंबई महापालिका ताब्यात घ्यायची असेल, तर भाजपला शिंदेंच्या शिवसेनेला साथीला घेतल्याशिवाय पर्याय नाही. परंतु शिंदे गटाचे डोईजड होणे, भाजप नेतृत्वाला परवडणारेही नाही. प्रशासक तथा मुंबई महापालिका आयुक्त आणि त्यांच्या खालोखाल येणारे अधिकारी वरून येणाऱ्या आदेशानुसार महापालिकेचा गाडा हाकत आहेत. पालिकेचे माजी नगरसेवकही विखुरले गेलेत. ही संधी साधून ठाकरे गटाचा रसद पुरवठा करणारे मुख्य केंद्र उद्ध्वस्त करण्याचे काम भाजप आणि प्रामुख्याने शिंदे गटाने केले आहे. पहिल्या महायुती सरकारच्या काळात एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना मुंबईचे तत्कालीन पालकमंत्री मंगल प्रभात लोढा यांनी मुंबई महापालिकेत शिरकाव केला होता. आयुक्तांच्या दालनाशेजारीच स्वतःचे दालन उभारून लोढा या दालनात नियमित बसायचेदेखील. तेव्हा महापालिकेत एकनाथ शिंदे यांचे विश्वासू इकबालसिंह चहल आयुक्त होते. परंतु ३ वर्षांहून अधिक काळापासून मुंबई महापालिकेत ठाण मांडून बसल्याने लोकसभा निवडणुकीआधी त्यांना हटवण्याची वेळ निवडणूक आयोगावर आली होती. यानंतर एकनाथ शिंदे यांनी चहल यांना सीएमओत अतिरिक्त मुख्य सचिवपदावर आणले. पुढे काही महिन्यांनी इकबालसिंह चहल अपर मुख्य सचिव (गृह) झाले. आता मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या खुर्चीत बदल झालाय. खुर्चीतील व्यक्ती बदलल्यात. परंतु इकबालसिंह चहल यांची मुख्यमंत्र्यांप्रती असलेली निष्ठा कमी झालेली नाही. हे विशेष. पालिका निवडणूक कधीही लागोत, त्यासाठी तयारीत असलेले एकनाथ शिंदे सध्या मुंबईतील जुन्या इमारतींना भेटी देत रहिवाशांशी संवाद साधताना दिसताहेत. कधी ते पुनर्विकास प्रकल्पावर रहिवाशांना मार्गदर्शन करताहेत, तर कधी मुंबईतील पायाभूत सुविधा प्रकल्पांना भेटी देत काम जलदगतीने होण्याच्या सूचना देताहेत. एकनाथ शिंदे सढळ हाताने निधी पुरवठा करण्यासाठी ओळखले जातात. त्यामुळे जुन्या चाळी, इमारतीत राहणाऱ्या मुंबईकरांना त्यांच्याकडून मोठ्या अपेक्षा आहेत. आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबईच्या पायाभूत सुविधांच्या कामात समन्वय साधत असतानाच चहल यांना शिंदे यांचा पालिकेतील दबदबा कमी करण्याची जबाबदारीही पार पाडावी लागणार आहे. ही जबाबदारी ते पेलतील की नाही त्यातूनच महापालिकेवर कंट्रोल कुणाचा, हे स्पष्ट होईल.

पृथ्वीवरील जीवनापुढे नवे आव्हान!

अमेरिकेतील कोरोसल ही कंपनी २०२१ पासून अस्तित्वात आली असून पशुपक्ष्यांच्या विलुप्त प्रजातींना पुन्हा जिवंत करण्याचे काम करत आहे. कंपनीच्या या मोहिमेअंतर्गत कोरोसलने सर्वात आधी लुप्त डायर वुल्फ या रानटी लांडग्याच्या प्रजातींवर प्रयोग केला. तो यशस्वी झाला असून या प्रजातीला पुनर्जीवित करण्यात संशोधकांना यश आलं आहे. यावरून कोरोसल कंपनीवर टीका होत असली तरी येत्या काही वर्षात वुली मेमोथ, डोडो आणि तसमावनियन वाघ या विशालकाय प्राण्यांची निर्मिती करण्याची तयारी सुरू आहे. हे प्राणी अस्तित्वात आले तर पृथ्वीवरील जीवनापुढे नवे आव्हान उभे राहू शकते.

दिवसेंदिवस वैद्यकीय क्षेत्रात प्रगती होत आहे. यामुळे असाध्य आजार आणि विकारांवरही उपचार करणं शक्य झालं आहे. काही देशांमध्ये तर आता रोबोच्या मदतीने ऑपरेशनही होऊ लागली आहेत. खरं तर ही कौतुकास्पद गोष्ट आहे. मानवी मेंदूची ही किमया आहे. त्यामागे संशोधकांची अनेक वर्षांची मेहनत आहे. पण हे सगळं मानवापर्यंत सीमित असेपर्यंत कौतुकास्पद वाटतं. मात्र प्रश्न जेव्हा हजारो वर्षांपूर्वीच्या नामशेष झालेल्या प्राण्यांच्या डी एक्सटिंक्शनचा म्हणजे त्या लुप्त प्रजातींना पुन्हा जिवंत करण्याचा येतो तेव्हा मात्र भविष्यात निर्माण होर्णाया धोक्याच्या विचाराने डोकं चक्रावतं.

हा सर्व ऊहापोह करण्याचे कारण म्हणजे काही दिवसांपूर्वी टाईम मॅगझीनने त्यांच्या कव्हर पेजवर एका पांढऱ्या रंगाच्या लांडग्याचा फोटो छापला. हा फोटो बघून अनेकांच्या काळजाचा ठोका चुकला. आपण जे पाहत आहोत ते खरं आहे की आभास आहे. असं कसं होऊ शकतं? अशी शंका अनेकांनी सोशल मीडियावर व्यक्त केली. कारण हा लांडगा जंगलात आढळणारा सामान्य लांडगा नसून चक्क १० हजार वर्षांपूर्वी जगातूनच लुप्त झालेला, नामशेष झालेल्या लांडग्याची प्रजाती आहे. विशेष म्हणजे कव्हर पेजवर दिसणारा हा लांडगा वयाने लहान असल्याने छोटा दिसत असला तरी प्रत्यक्षात तो ज्या प्रजातीमधून येतो ती ४ ते ५ फूट उंची असलेल्या लांडग्याची जात आहे. यामुळे आता आकाराने लहान असलेल्या या लांडग्याचे काही दिवसातच विशायलकाय लांडग्यात रुपांतर होणार हे निश्चित आहे.

दरम्यान, या लांडग्यांच्या निर्मितीची सुरुवात झाली ती अमेरिकेच्या ओहायो येथून. येथे संशोधकांना ७२ हजार वर्षांपूर्वी नामशेष झालेल्या लांडग्याचे दात आणि अवशेष सापडले होते. या अवशेषांची डीएनए चाचणी केल्यानंतर जीन एडीटींग तंत्राच्या मदतीने सामान्य लांडग्याच्या ब्लड सेल्स एकत्र करून त्यावर रासायनिक प्रक्रिया करण्यात आल्या. त्यानंतर एका सरोगेट कुत्रीच्या गर्भात हे भ्रूण विकसित करण्यात आले. ऑक्टोबर २०२४ ते फ्रेबुवारी २०२५ या कालावधीत तिने ३ पिल्लांना सिझेरियन पद्धतीने जन्म दिला. खरं तर अमेरिकेतील कोरोसल या बायोटेक कंपनीने हा लांडगा जन्माला घातला आहे.

कोरोसल ही कंपनी २०२१ पासून अस्तित्वात आली असून पशुपक्ष्यांच्या विलुप्त प्रजातींना पुन्हा जिवंत करण्याचे काम करत आहे. कंपनीच्या या मोहिमेअंतर्गत कोरोसलने सर्वात आधी लुप्त रानटी लांडग्याच्या प्रजातींवर प्रयोग केला. तो यशस्वी झाला असून या प्रजातीला पुनर्जीवित करण्यात संशोधकांना यश आलं आहे. दरम्यान, या तीन पिल्लांना अमेरिकेत अज्ञातस्थळी ठेवण्यात आले असून संशोधकांचे एक विशेष पथक त्यांच्या हालचालींवर नजर ठेऊन आहे. यातील दोन नर असून एक मादी आहे. रोम्युलस, रिमस आणि खालेसी अशी त्यांना नावे देण्यात आली.

या पिल्लांना जन्माला घालून अमेरिकेने जगभरात आपल्या हुशारीचा डंका जरी पिटला असला तरी दुसरीकडे या संशोधनावरून संशोधकांचे दोन गट पडले आहेत. एका गटानुसार हजारो वर्षापूर्वी त्या वातावरणात जगणारे हे प्राणी आजच्या वातावरणात जिवंत राहू शकणार नाहीत. शिवाय यांना जन्माला घालणे सोपे नाही. ते वजनाने अधिक असल्याने त्यांना जन्माला घालणे सरोगेट मदर्सच्या जीवावर बेतू शकते. त्याचबरोबर या प्राण्यांचे मूळ रुप हे आक्रमक, हिंस्त्र, विशाल आहे. यामुळे या प्राण्यांना निर्माण करून त्यांचा गैरवापर होण्याचीच शक्यता अधिक आहे. या प्राण्यांचा वापर सर्कसप्रमाणे मनोरंजनासाठी केला जाऊ शकतो. या अजस्त्र प्राण्यांचा वापर जैविक शस्त्र म्हणूनही केला जाऊ शकतो किंवा ज्युरासिक पार्क या इंग्रजी चित्रपटातील डायनोसर पार्कची ही पुनरावृत्ती ठरू शकते.

दरम्यान, जग कितीही आक्षेप घेत असले तरी कोलोसल कंपनीचे संशोधक मात्र आपल्या लॅबमध्ये बिझी असून येत्या काही वर्षात वुली मेमोथ, डोडो आणि तसमावनियन वाघ या विशालकाय प्राण्यांच्या निर्मितीमध्ये दंग आहेत. त्यातच टेस्लाचे प्रमुख ॲलन मस्क हे देखील अशा विशालकाय प्राण्यांच्या जगाच्या प्रतीक्षेत असून त्यांच्या पोस्टवरून ते वुली मेमोथला आपल्या ताफ्यात सामील करण्यास उत्सुक असल्याचे बोलले जात आहे. यावर हे सगळे उद्योग करायची गरज काय तर कोलोसल कंपनी पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी लुप्त प्राण्यांना जिवंत करण्याचे काम करत असल्याचे सांगत आहे. पण खरं तर निसर्ग नियमानुसार ज्याप्रमाणे पृथ्वीतलावर जन्मास येणाऱ्या प्रत्येक सजीवाचा आरंभ आणि अंत एका कालावधीत होणे ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. अनंत काळापासून ते सुरू आहे. मग असे असताना लुप्त झालेले प्राणी जिवंत करण्यामागे अमेरिकेचा उद्देश काय असा प्रश्नही निर्माण झाला आहे. यावर आंतरराष्ट्रीय स्तरावर चर्चासत्रंही झडू लागली आहेत. यामागे अनेक कारणे असल्याचे जरी सांगण्यात येत असले तरी याची गरज आहे का, हा मूळ प्रश्न आहे. कारण हजारो वर्षांपूर्वी पृथ्वीतलावर अस्तित्वात असलेले हे विशाल, महाकाय प्राणी आताच्या प्राण्यांच्या तुलनेने बरेच आक्रमक व आव्हानात्मक असतील. यामुळे सध्या जे प्राणी अस्तित्वात आहेत त्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण होईल. विशालकाय प्राण्यांपुढे त्यांचा टिकाव लागणार नाही. परिणामी निसगार्चा समतोल बिघडू शकतो, असे काही तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

तसेच कोलोसलचे संशोधक फक्त या लांडग्याच्या प्रजातीच्या निर्मितीवर थांबलेले नसून येत्या चार वर्षात वुली मेमोथ या विशालकाय अंगावर केस असलेल्या हत्तीची निर्मिती करत आहेत. हत्तीच्या या प्रजाती प्रामुख्याने त्यांच्या शरीरावरील असलेल्या दाट केसांमुळे बर्फाळ प्रदेशातही टिकून राहतात. या हत्तींना पुन्हा पुनर्जीवित केल्यास टुंड्रा प्रदेशसारख्या बर्फाळ प्रदेशात निर्माण झालेले नैसर्गिक आव्हान संपुष्टात येईल. तसेच या डी एक्सटिंक्शनचा प्रयोग यशस्वी झाल्याने भविष्यात जास्तीत जास्त जेनेटिक संशोधन आणि क्लोनिंगसाठी याचा वापर करता येणार आहे, असे संशोधकांचे म्हणणे आहे. खरं तर अमेरिकेत सध्या या डायर वुल्फवरून मतमतांतरे आहेत. कारण डी एक्सटिंक्शनचा हा प्रयोग पहील्यांदा करण्यात आलेला नसून याआधी ५ जुलै १९९६ रोजी स्कॉटलंडच्या वैज्ञानिकांनी क्लोनिंगद्वारे डॉली मेंढीला जन्मास घातले होते. 'न्यूक्लियर ट्रान्सफर' तंत्रज्ञानाद्वारे डॉलीला प्रयोगशाळेत तयार करण्यात आले होते. त्यानंतर माणसांचे क्लोन बनवण्याचाही प्रयत्न करण्यात आला, पण त्यात संशोधकांना यश मिळाले नाही. पण आता थेट नामशेष झालेल्या प्राण्यांच्या जीवाश्मातून प्रजाती निर्माण करता येते हे सिद्ध झाल्याने पुन्हा एकदा संशोधकांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

यावेळचा प्राण्यांच्या डी एक्सटिंक्शनचा प्रयोग हा हॉलिवूड चित्रपटाप्रमाणे मानवाचाच विध्वंस करणारा ठरू नये एवढीच अपेक्षा. कारण ज्या मानवी जगात शास्त्रज्ञ हजारो वर्षांपूर्वी लुप्त झालेल्या प्राण्यांच्या प्रजातींना पुन्हा आणू पाहत आहे ते पृथ्वीचा समतोल राखण्यापेक्षा बिघडवण्याचीच शक्यता अधिक आहे. कारण आता हजारो वर्षांपूवीचौ घनदाट जंगले, ते वातावरण, ते अन्नच काय आकाशही या पृथ्वीतलावर या प्राण्यांसाठी उपलब्ध नाही. यामुळे माणसांच्या या सिमेंटच्या जंगलात विशालकाय प्राण्यांना मोकाट फिरावयाचे असल्यास माणसांना स्वतःला पिंजऱ्यात बंद करून घ्यावे लागेल. अन्यथा दुसऱ्या पृथ्वीगृहाची निर्मिती करून तेथे हे अजस्त्र प्राण्यांचे संगोपन करून न्यू ज्युरासिक पार्क सुरू करावे लागणार आहे.

नियोजन कधी?

देशात बहुतेक ठिकाणी पारा चाळिशीच्या पार गेलेला असताना, यंदा मान्सून सरासरीहून अधिक बरसणार असल्याची बातमी ही वळवाच्या सुखद सरींसारखीच म्हणायला हवी. पावसाळा सुरू होण्यास अजून दोन महिने असले, तरी पावसाळ्याच्या नियोजनासाठी, शेतीच्या तयारीसाठी ही बातमी महत्त्वाची आहे. भारत जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था होण्याच्या दिशेने निघाला असला, तरी ही अर्थव्यवस्था अजूनही शेतीवरच अवलंबून आहे; आणि शेती पावसावर अवलंबून आहे. तिन्ही बाजूंनी समुद्र आणि ईशान्येपासून उत्तरेपर्यंत असलेल्या हिमालयाच्या रांगा या भूगोलामुळे मान्सूनचे वरदान लाभलेल्या भारतात जून ते सप्टेंबर या काळात हा पाऊस बरसतोच. त्याचे प्रमाण कमी-अधिक होते हे खरे. तोही हवामानाप्रमाणे लहरी असल्याने त्यात अस्वाभाविक काही नाही. त्यामुळेच यंदाच्या हंगामात तो कसा बरसणार, वेळेत येणार का, मध्ये मोठा खंड पाडणार का, असे अनेक प्रश्न केवळ शेतकऱ्यांनाच नव्हे, तर सर्वसामान्यांपासून धोरणकर्त्यांपर्यंत सर्वांना पडलेले असतात. त्यांची उत्तरे अंदाजातून मिळतात. हवामान खात्याकडून वर्तविले जाणारे अंदाज हे कधी काळी विनोदाचे विषय होते; परंतु आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने विकसित केलेल्या नव्या हवामानशास्त्रीय प्रारूपांमुळे हे अंदाज चुकण्याचे प्रमाण कमी झालेले आहे. अपवाद वगळता गेल्या बहुतेक वर्षांतील अंदाज बरोबर आले आहेत. अलीकडच्या काळात काही खासगी संस्थाही पावसाचा अंदाज वर्तवू लागल्या आहेत. त्यामुळे पावसाचे वर्तन कसे असेल, याचे अनुमान करणे अवघड राहिलेले नाही. यंदाच्या पावसाबाबत खासगी संस्था आणि हवामान खात्याने वर्तविलेल्या अंदाजांत फार तफावत नाही. त्यामुळे चांगल्या पावसाची अपेक्षा करायला हरकत नाही. यंदा दीर्घकालीन सरासरीच्या १०६ टक्के पाऊस होईल, असा हवामान खात्याचा अंदाज आहे. १९७१ ते २०२० या पन्नास वर्षांच्या कालावधीत झालेल्या मोसमी पावसाची सरासरी आहे ८७० मिलिमीटर. म्हणजेच या वर्षी देशभरात सरासरी नऊशे मिलिमीटरहून अधिक पाऊस होऊ शकतो. प्रशांत महासागर आणि हिंदी महासागर यांच्या पृष्ठभागाच्या तापमानाचा मान्सूनवर परिणाम होत असतो. यंदा या दोहोंशी संबंधित असलेले घटक मान्सूनला अनुकूल असल्याचे निरीक्षण आहे. शिवाय युरोप आणि आशिया येथे डिसेंबर ते मार्च या काळात तुलनेने कमी हिमवृष्टी झाली आहे. त्यामुळे यंदा पाऊस चांगला होईल, असा निष्कर्ष काढण्यात आला आहे. प्रशांत महासागरातील तापमानाशी संबंधित असलेला 'एल निनो' हा घटक सक्रिय असल्याचा फटका २०२३मध्ये बसला होता. मात्र, गेल्या वर्षी तो सक्रिय नव्हता; त्यामुळे सरासरीच्या १०८ टक्के पाऊस झाला होता. यंदाही हा घटक सक्रिय नसल्याने असाच चांगला पाऊस होईल, असे दिसते. मात्र, मान्सून सरासरी गाठत असला, तरी देशाच्या सर्व भागांत तो सारख्याच प्रमाणात पडत नाही, हे वास्तव आहे. गेल्या काही वर्षांपासून ईशान्य भारतातील त्याचे प्रमाण कमी झाल्याचे निरीक्षण आहे. यंदाही ईशान्य भारतात तो अपेक्षेइतका पडणार नसल्याची चिन्हे असल्याचे बोलले जात आहे. महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, तेलंगण, छत्तीगसड या राज्यांच्या काही भागांत खूपच चांगला पाऊस होण्याची शक्यता दिसते. याबाबतचा नेमका अंदाज १५ मे नंतर जाहीर होईल, त्यावेळी नेमके चित्र स्पष्ट झालेले असेल. पाऊसपाणी चांगले राहणार ही आनंदाची बातमी थोड्या-फरकाने दरवर्षी आपल्याला मिळते. निसर्ग सतत असा अनुकूल राहील, असा आशावाद बाळगत आपण वावरत असतो. वास्तविक गेल्या काही वर्षांपासून लहरी हवामानाचा फटका भारतासह साऱ्या जगाला बसतो आहे.

सरकारसाठी जनतेला त्याग करावा लागेल!

येणाऱ्या काळात सामान्य जनतेवर आर्थिक भार वाढणार आहे, हे वास्तव अधिक स्पष्ट होत आहे. सरकारच्या महसुली तुटीमुळे विविध कर, शुल्क आणि परवाना दर वाढवले जात असून, त्याचा परिणाम थेट नागरिकांवर होत आहे. 'लाडकी बहीण'सारख्या योजनांसाठी इतर कल्याणकारी योजनांचे निधी वळवले जात आहेत. वाढते कर्ज, खर्च आणि सवलतींचा भार यातून राज्याची आर्थिक घडी विस्कटली असून, सर्वसामान्यांना त्याची किंमत चुकवावी लागणार आहे.

मालमत्ता व्यवहारांची नोंदणी करताना करारनाम्याच्या प्रत्येक पानासाठी २० रुपये असणारे हाताळणी शुल्क आता ४० रुपये झाले आहे. पूर्वी १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर होणारे विविध प्रकारचे प्रतिज्ञापत्र वा व्यवहार ५०० रुपयांच्या पेपरवर करावे लागत आहेत. मद्य निर्मिती व विक्री करणारे परवानाधारक त्यात कारखाने, किरकोळ व ठोक विक्रेते, परमिट रुम आणि बार या सर्वांच्या वार्षिक परवाना शुल्कात १५ टक्के वाढ करण्यात आली. याचा अंतिम भार ग्राहकांवरच येणार आहे.

जीएसटी, मद्यविक्री, मुद्रांक शुल्क, आरटीओकडून वाहनांवर वसूल केले जाणारे कर आणि शुल्क हे सरकारचे हक्काचे उत्पन्नाचे स्रोत असल्याने जेव्हा जेव्हा राज्याची तिजोरी खंगते तेव्हा येथूनच अधिकाधिक पैसा काढला जातो. यानंतर क्रमांक लागतो तो बांधकाम परवाने, एफएसआय (चटई क्षेत्र निर्देशांक), प्रिमियम भरून वाढीव बांधकाम करण्यासाठी परवानगी या विषयांचा. इथेही वाढ झाली की बिल्डरमंडळी ती ग्राहकांवर टाकून देतात.

हे सर्व हळूहळू वाढतच जाणार हे सांगण्यासाठी आता कोणाही तज्ञाची गरज नाही. सरकारवर कर्जाचा बोजा आहे, महसुली तूट, म्हणजेच सरकारचे उत्पन्न आणि सरकार चालविण्यासाठी लागणारा खर्च यात तब्बल ४५ हजार कोटी रुपयांचे अंतर आहे, हे सारे जनतेलाच सोसायचे आहे. कोण सुपात आहे तर कोण जात्यात आहे. कोणाला असे वाटत असेल की आपल्याला महिन्याला लाडका, लाडकी, अतिलाडका, अतिलाडकी अशा कोणत्या योजनेतून पैसे मिळतात तर त्यांना याचेही भान हवे की कोणत्या ना कोणत्या मागार्ने हे पैसे परत सरकारी तिजोरीत जातात.

लाडकी बहिण योजनेचे नियम अधिकाधिक काटेकोरपणे तपासले जात आहेत. अपात्र लाभार्थ्यांची नावे वगळली जात आहेत. आहे त्या लाभार्थ्यांना देण्यासाठी वेगळा निधी नसल्यामुळे लाभार्थी ज्या सामाजिक प्रवर्गातून येतो त्याची जबाबदारी असेलल्या शासकीय विभागांच्या निधीतून हा पैसा वळता केला जात आहे. उदाहरणार्थ अनुसूचित जाती वगार्तील लाभार्थ्यांसाठी सामाजिक न्याय विभागाचा निधी वळता केला गेला आहे. या खात्याचे मंत्री संजय शिरसाट म्हणाले की, सुमारे सात हजार कोटी रुपये अशा पद्धतीने वळवले गेले. काहींच्या मते ही रक्कम चार हजार कोटी रुपये आहे.

आदिवासी विभागाचे सुमारे ३७०० कोटी रुपये यासाठी वळवले गेले. इतर मागास बहुजन कल्याण म्हणजेच ओबीसी, भटक्या व विमुक्त जाती-जमातीसाठीच्या विभागातूनही अशाच पद्धतीने पैसा लाडक्या बहिणींसाठी वळविला गेला आहे. याचा अर्थ असा की, या सर्व विभागांना आपापल्या योजनांचा फेरविचार करावा लागणार आहे. सामाजिक न्याय, आदिवासी विकास, इतर मागास बहुजन विकास, भटक्या आणि विमुक्त प्रवर्गाच्या कल्याणासाठी अथवा वैयक्तिक लाभासाठी असलेल्या योजनांमध्ये काहींना काही बदल होणार आहेत.

काही योजना बदलल्या जातील, काही स्थगितसुद्धा होऊ शकतात, तर काहींची तरतूद कमी झाल्याने नवे लाभार्थी जोडले जाऊ शकणार नाहीत. हे सर्व अपरिहार्य आहे. लोकांनी निवडून दिलेली सरकारे कोणत्याही पक्षाची असोत ती पैसा जनतेकडूनच उभा करतात. आता जोडीला कर्ज उभारणी अपरिहार्य ठरत आहे. कोणत्याही पक्षाचे सरकार आम्ही अजिबात कर्ज काढणार नाही, असे म्हणूच शकत नाही. त्यामुळे आता पाहता पाहता राज्यावरील कर्जाचा भार ९ लाख कोटींच्या पुढे जाणार आहे. त्याचे व्याज भरण्यासाठीच कैक हजार कोटी रुपये लागणार आहेत.

लोकशाही व्यवस्था खूप महाग असते असे देश स्वतंत्र झाल्यानंतर सुरुवातीला वाटले नसावे. पण देशातील अनेक राज्यांची स्थिती पाहिली तर ही व्यवस्था प्रचंड महाग आहे हे सुजाण नागरिकांना पटेलच. आज महाराष्ट्र विविध कर आणि शुल्कांतून पाच लाख कोटीहून अधिक रक्कम मिळवतो. त्यातील अडीच लाख कोटी रुपये तर शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते, निवृत्तीवेतन यावरच खर्च होतात. सरकारी कार्यालये चालविणे, रंगरंगोटी, वाहने, शासकीय अधिकारी, कर्मचारी यांच्यासाठी निवासस्थाने त्याची दुरुस्ती देखभाल, राजभवन, न्याययंत्रणा, विधिमंडळ यांच्या खचार्साठी सुद्धा खूप मोठा निधी लागतो. हे सर्व बाजूला काढल्यानंतर उर्वरित रक्कम जनतेच्या विकासायोजनांसाठी ठेवली जाते. ती आता फार कमी होत गेली आहे. म्हणूनच विकासाची कामे कजार्तून पूर्ण केली जात आहेत. अधिक विकास, अधिक कर्ज, महा-विकास, महा-कर्ज या चक्रात महाराष्ट्र अडकला आहे.

यातून बाहेर कसे पडावे, हा प्रश्न काहींना पडेल. त्यासाठी जनतेचे प्रबोधन करावे लागते. ते करण्यासाठी कोणताही राजकीय पक्ष तयार होणार नाही. कारण प्रत्येकाला मते हवी असतात, सोबत सत्ता हवी असते. जनतेला ज्ञान शिकविण्याची कोणाची तयारी नाही. आता निवडणूक तरी कुठे स्वस्त राहिली आहे असा प्रश्न केला जातो. निवडणुकीत कोणता उमेदवार काय करतोय, मतदारांशी कसा संपर्क साधतोय, आपल्यापर्यंत येतोय की नाही याची उत्सुकता असणारांना आपण आपल्याच मुला-बाळांचे, भाऊबंदांचे भवितव्य सरकार घडवतेय की नाही हे विचारण्याचा अधिकारच संकुचित करतो आहोत, याचे भान नसेल का?

सरकार म्हणजे केवळ मंत्रालय नव्हे, तर सरकारने त्यासाठी तयार केलेल्या विविध व्यवस्था ज्यात प्राधिकरणे, मंडळे, महामंडळे येतात. आज सरकारी तिजोरीतून मोठी रक्कम वीज मंडळाचे अंग असलेल्या महावितरणला द्यावी लागत आहे. एसटी महामंडळाला ठराविक रक्कम दिल्याशिवाय हे महामंडळ चालू शकणार नाही हे परवा एसटी कर्मचाऱ्यांचे ५६ टक्केच वेतन केल्यावर स्पष्ट झाले. उर्वरित ४४ टक्के वेतन देण्याची व्यवस्था लगेच करा अन्यथा तुमच्या दालनातून बाहेर पडणार नाही, असे परिवहनमंत्री अर्थ विभागाच्या एका वरिष्ठ सचिवांना म्हणाले. अखेर तिथून ते निधीची तरतूद करूनच बाहेर पडले. हे एकदा केले म्हणजे प्रश्न कायमचा मिटणार नाही.

आज एसटी प्रवासासाठी ७५ वर्षांवरील नागरिक, महिला आदींना सवलती आहेत. या सवलती निवडणूक डोळ्यासमोर ठेवून दिल्या गेल्या होत्या. सवलतीची रक्कम मोठी आहे. प्रत्येक प्रवासी गरज म्हणून प्रवास करतोय की, सवलत मिळतेय म्हणून चला जाऊन येऊया म्हणून प्रवास करतोय याचा विचार कोण करणार?

एकीकडे लाडक्या बहिणीच्या घरी नमो किसानसारख्या योजनेतून महिन्याला एक हजार रुपये येत असतील तर तिला दीड हजारांऐवजी ५०० रुपये दिले जात आहेत. खरे तर शेतकऱ्यांना वर्षाला विशिष्ट रक्कम देण्याची घोषणा केंद्राने केली व अंमलात आणली. त्यात राज्याने आपली भर घातली व लोकप्रियतेच्या लाटेवर स्वार होण्याचा प्रयत्न केला. ही वार्षिक रक्कम दर तीन महिन्यांनी जमा करणे अपेक्षित असते. त्याचा महिनावार हिशेब काढून तो लाडकी बहीणसोबत जोडला गेला. आता एसटी प्रवास सवलतीपोटी एका लाभार्थ्याला अमुक एक रक्कम खर्च होते म्हणून तीही याच्याशी जोडली गेली नाही तर नवलच.

निवडणुका जवळ आल्या की, राजकीय पक्ष चिंतेत पडतात. सत्तेत असणाऱ्यांना आपण सत्तेत कायम राहण्यासाठी व विरोधकांना सत्तेत येण्यासाठी लोकप्रिय घोषणा कराव्या वाटतात. यातून राज्याचे आर्थिक आरोग्य धोक्यात येतेय, पुढच्या कैक पिढ्यांचे नुकसान होतेय, असे कोणालाच वाटत नाही हे अधिक चिंताजनक आहे.

सामाजिक न्यायाचा टप्पा

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून तेलंगणमधील काँग्रेस सरकारने सामाजिक न्यायाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. अनुसूचित जातींच्या वर्गीकरणाची अंमलबजावणी करणारे तेलंगण देशातील पहिले राज्य ठरले. शिक्षण आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये यापुढे नव्या वर्गीकरणानुसार अंमलबजावणी होईल. गेल्या वर्षी १ ऑगस्टला सर्वोच्च न्यायालयाने ऐतिहासिक निकाल दिला; अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांचे उपवर्गीकरण करून या समुदायांमधील सर्वात दुर्लक्षित गटांना स्वतंत्र कोटा देण्याचा तो महत्त्वाचा निर्णय होता. आरक्षण देताना सर्व जातींना वषार्नुवर्षे एकाच पारड्यात तोलले गेले. यामुळे काही विशिष्ट जातींना याचा मोठा फायदा झाला आणि काही जाती मात्र आरक्षण असूनही अधिकाधिक वंचित राहत गेल्या. हा अनुशेष लोकसंख्येसोबत वाढत गेला. सरकारी नोकऱ्यांमध्ये तर काही विशिष्ट जातींची मक्तेदारी निर्माण झाल्याचे स्पष्ट दिसत होते. ऐतिहासिक आणि अनुभवजन्य पुराव्यांनुसार अनुसूचित जातींचा गट एकसंध नाही, हे महत्त्वाचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले होते. हा निकाल आल्यानंतर तातडीने हालचाली करून या वर्गीकरणासाठी तेलंगण सरकारने उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती शमीम अख्तर यांच्या अध्यक्षतेखाली आयोग स्थापन केला होता. फेब्रुवारी महिन्यात आयोगाच्या शिफारशी सरकारने स्वीकारल्या. अनुसूचित जातींचे तीन गटांमध्ये वर्गीकरण करताना सर्वोच्च न्यायालयाच्या निकालासह, अनुभवजन्य माहिती, अनुसूचित जाती समुदायांची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, रोजगार आणि राजकीय स्थिती विचारात घेतली. तेलंगणमध्ये ५९ अनुसूच

कॉर्न फ्रिटर

साहित्य : मक्याचे दाणे उकडून चेचून, उकडून किसलेला बटाटा, आवडत असल्यास किसलेले चीझ (चेडस चीझ असल्यास उत्तम), मिरपूड, ओरिगनो, बेसिल चुरडून, नसल्यास ड्राय हर्ब्स, किंचित साखर, मीठ, रेड चिली फ्लेक्स. यामध्ये आवडत असेल तर पालक किंवा गाजरही बारीक चिरून अथवा किसून घालता येईल.

कृती : एका भांड्यात सर्व साहित्य एकत्र करावे. त्याचे चपटे गोळे करावे आणि तव्यावर छान तेलात परतून घ्यावेत. फुटत असतील तर थोडा मैदा, कॉर्नफ्लोअर, ब्रेड कुस्करून घालावा. यामुळे ते मिश्रण मिळून येईल. झाले आपले कॉर्न फ्रिटर तयार.

प्रसंगानुरूप मनुष्य वेगवेगळ्या प्रकारचे आणि आवश्यकतेनुसार तऱ्हेतऱ्हेचे वस्त्रप्रकार उपयोगात आणत असतो. त्यातलाच एक प्रकार आहे नाइटविअर. हा एक असा प्रकार आहे, जो आपले स्थान केवळ टिकवूनच नाही, तर दिवसेंदिवस अधिकाधिक 'स्टायलिश' होत आहे. ज्या नाइटविअरला आपण अधिक करून गाऊन या एकाच नावाने ओळखत, संबोधत असू तो आज कमालीच्या विविध अवतारांमध्ये दिसतो.

तऱ्हेतऱ्हेचे नाइटविअर

कोणे एकेकाळी ज्याची सुरुवात झाली असावी, केवळ सोय व आवश्यकता म्हणून. दिवसभराच्या हर तऱ्हेच्या कपड्यांचे ओझे वागवून जीव व देह दोन्हींना जरा आराम मिळावा, यासाठी सुटसुटीत असा हा झोपतानाचा पोशाख म्हणजेच नाइटविअर. हे खरे वाटत नाही ना? तेव्हा या अपेक्षांची पूर्ती करायला रोज वापरून मऊसूत झालेला, अक्षरशः अंगवळणी पडलेल्या एखाद दुसऱ्या रोजच्या ड्रेसने तेव्हा सुरुवात झाली असावी. हळूहळू याच्याकडेही लक्ष दिले जाऊ लागले असावे. त्यामुळेच याला एक विशिष्ट रूप आले. मग त्याची अनेक रूपे झाली. आज ही रूपे शमीस, नाइट ड्रेस कप्तान, गाऊन, मॅक्सी, रॅप सेट, टॉप-शॉर्ट्स सेट, बेबी डॉल अशी आहेत.

शमीस हा साधारणतः सिंगल पीस असतो व लांबीला गुडघ्यांच्या थोडासा वर असतो. यातही आता टू-पीस किंवा रॅप असा आणखी एक प्रकार आला आहे. सेट म्हणजेच टी शर्ट-स्लीव्हलेस व पँट थ्री-फोर्थ असा ट्रेंड आहे. टीनएजर्ससाठी टॉप-शॉर्ट सेट विशेष करून आवडीचा होताना दिसतोय. रंग संगतीबद्दल ही आजकाल प्रत्येक जण 'चुझी' होताना दिसत आहे. नाइटविअरही त्याला अपवाद नाही. पांढरा, क्रीम, लायलॅक, पिंक, रेड, ब्लॅक हे झाले क्लासिक्स, तर नवीन रंगांमध्ये प्लम, परपल, हॉट पिंक, ॲक्वा म्हणजेच हॉट ब्ल्यू. पांढरा, गुलाबी, यलो, ब्राऊन, टरक्वॉइज या रंगांना पसंती आहे. इतकेच नव्हे तर त्याची डिझाइन, वापरलेले मटेरिअल या गोष्टींकडे ही विशेषत्वाने लक्ष दिले जाते. ब्रायडल आणि डिझायनर नाइटविअरला सुद्धा खूप मागणी आहे यातही पॅटर्नबद्दल बोलायचे झाले, तर पायघोळ, हॉल्टर नेक, योक पिस, शेपली म्हणजेच जास्त घेर नसलेला, फुल, थ्री-फोर्थ हे आहेतच. शिवाय प्रिंटबद्दल काय विचारायचे. प्लेन, टेक्सचर्ड, एम्ब्रॉयडरी, लाइट आणि ब्राइट प्रिंटेड, ॲबस्ट्रॅक्ट प्रिंटेड हे आहेचत, पण क्लासिक म्हणावे असे हलकेफुलके फ्लोरल व पोल्का डॉट्स आपले वर्चस्व टिकवून आहे. नाइटविअर म्हणजे दैनंदिन जीवनातील एक अविभाज्य घटक बनलेला आहे. त्यामुळे त्याची 'डिमांड' रंग लाई है. तो स्टायल स्टेटमेंट ठरत आहे. यातून आपण आपली निवड करावी व स्टाइल-स्टेटमेंट ठरवावे.

केस गळत आहे, टक्कल पडतंय आणि अनेक उपाय करूनही फायदा मिळत नाहीय, तर हे तेल आपल्यासाठी उत्तम पर्याय आहे. याने टक्कल पडलेल्या जागेवरही नवे केस येतील आणि केस दाट होतील. पाहू कसं तयार करायचं हे तेल..

या तेलाने उगवतात नवे केस

हे तेल तयार करण्यासाठी आपल्याला ५ वस्तूंची गरज आहे ज्या सहजपणे उपलब्ध असतात.

लसणाच्या पाकळ्या : ६ ते ७ ताजा चिरलेला आवळा : २ ते t चिरलेला कांदा : १ लहान एरंडेल तेल : ३ चमचे नारळाचे तेल : ४ चमचे

या पाचही वस्तू मिसळून आपण तेल तयार करू शकता.

कृती - सर्वात आधी एका वाटीत नारळाचे तेल आणि एरंडेल तेल मिसळून घ्या. आता यात कापलेला लसूण, कांदा आणि आवळा टाका. हे मिश्रण मंद आचेवर ५ मिनिटे शिजवून घ्या. आता आचेवरून काढून १ तास हे मिश्रण असंच राहू घ्या. हे तेल नियमितपणे केसांना लावल्याने, केसांचे गळणे कमी होईल आणि गळलेल्या केसांमुळे डोक्यावरील त्वचा दिसायला लागली असेल तर तिथेही नवे केस येतील. याव्यतिरिक्त केसांमध्ये दाटपणा येईल. तर वेळ करू नका, तयार करा आणि या केसांना नवीन जीवन.

महिला असो किंवा पुरुष आपल्या लठ्ठपणामुळं हैराण असतात. या लठ्ठपणामागे अनेक कारणं असतात. आपलं खाणं-पिणं, राहणं यांचा सतत परिणाम आपल्या लठ्ठपणावर होतो. त्यामुळं आपल्या सौंदर्यावर तर परिणाम होतोच शिवाय आरोग्यही धोक्यात येतं.

लठ्ठपणा वाढण्याची सहा कारणे, हे उपाय करा!

दररोज काबोर्नेटेड ड्रिंक्स पिणं

जर आपण दररोज सोडा पित असाल तर सावधान, कारण त्याच्या सेवनानं लठ्ठपणा वाढू शकतो. संशोधनकर्त्यांनुसार दररोज सोडा प्यायल्यानं लठ्ठपणा जोमानं वाढतो. तर आठवड्यात एक वेळा सोडा प्यायल्यानं प्रकृतीवर जास्त परिणाम होत नाही. खूप जणांना वाटतं की डायट सोड्यात कमी कॅलरीज असतात. मात्र या कॅलरीजसुद्धा प्रकृतीसाठी हानीकारक असतात. त्यात साखरेचं प्रमाण अधिक असतं म्हणून जेवताना सोडा पिणं टाळावं. जर तुम्हाला जेवताना काही ड्रिंग प्यायचंच असेल तर फळांचा ज्यूस प्या.

जास्त फॅट्सयुक्त पदार्थ खाल्ल्यानं...

लठ्ठपणासाठी सर्वात जास्त जबाबदार खाण्या-पिण्याच्या सवयी असतात. जर तुम्ही बेसुमार मिष्ठान्न, तुप, फास्टफूड खात असेल तर लठ्ठपणाला सामोरं जावं लागेल. आपल्या आहारात जास्त फॅट्सयुक्त पदार्थ नसावे, याची काळजी तुम्हालाच घ्यायचीय. कारण त्यात कॅलरीची संख्या खूप कमी असते. त्यामुळं ते टाळल्यानं शरीर स्वस्थ आणि लठ्ठपणा विहरहित राहील. जेवणार ऑलिव्ह ऑर्लचा वापर करावा.

रात्री उशिरा जेवण करणं आणि लगेच झोपणं...

हे खरंय की जेव्हा आपण झोपता, तेव्हा नॅचरली आपल्या शरीरातून चरबी कमी होते. मात्र पोटभर जेवून झोपल्यानं असं घडू शकत नाही. अनेक जण रात्री खूप उशिरानं जेवतात, ज्यामुळं त्यांना पोटाशी संबंधित अनेक समस्यांना सामोरं जावं लागलं. सोबतच लठ्ठपणा ही समस्याही निर्माण होते. जर तुम्ही योग्य वेळी जेवणाची सवय लावाल, तर लठ्ठपणा कमी करण्यात मदत होईल. सोबतच रात्री जेवण कमी करावं आणि फळं खावीत. याशिवाय जेवल्यानंतर लगेच झोपू नये. कारण असं केल्यानं जेवण पचत नाही. आपल्या जेवणाऱ्या आणि झोपण्याच्या मध्ये कमीत कमी तीन तासांचं अंतर असावं.

जेवणासाठी मोठं ताट वापरणं...

जेव्हा आपण घरी किंवा बाहेर जेवता तेव्हा जेवताना आपल्या ताटाच्या आकाराकडे विशेष लक्ष द्यावं. एका सर्व्हेनुसार जे लोक जेवणासाठी मोठं ताट घेतात, त्यात भरपूर पदार्थ वाढून घेतात. त्यामुळं आपल्या शरीराच्या गरजेपेक्षा जास्त जेवण जेवल्या जातं. जर तुम्हाला लठ्ठपणा कमी करायचा असेल तर नेहमी छोट्या प्लेटमध्येच जेवा. यामुळे तुम्ही तुमची ओव्हर इटिंगची सवय बंद करू शकाल.

क्रोध आणि तणावात असताना अधिक जेवणं करणं...

आपण नेहमी बघितलं असेल की जेव्हा आपल्या खूप क्रोध येतो किंवा आपण तणावात असाल तर तुम्ही जास्त जेवू लागता. त्यावेळी जेवण चांगलं तर लागत नाही मात्र मनाला शांत करण्यासाठी आणि आणखी काही विचार करण्यासाठी तुम्ही खूप जेवता. त्यामुळं हळूहळू चरबी जमा होत जाते. क्रोध आणि तणाव असताना जास्त जेवण करणं टाळायचं असेल तर पाणी प्या. मित्रांसोबत गप्पा मारा आणि आराम करा. त्याशिवाय इतर कोणत्याही ॲक्टिव्हिटी आपण करू शकता. ज्यामुळं तुम्ही भावूक असताना एक्स्ट्रा कॅलरीज घेण्यापासून वाचू शकता.

व्हॉट्सॲपचे हे फीचर माहितेय का?
कोणत्याही भाषेत पाठवता येतो मेसेज, पाहा ट्रिक्स



आजकाल सगळेच नातेवाईकांशी किंवा मित्रांशी मेसेजवर बोलण्यासाठी व्हॉट्सॲपचा वापरतात. जर तुम्हीही व्हॉट्सॲप युजर असाल तर ही माहिती तुमच्यासाठी खूप महत्त्वाची आहे. मेटा-मालकीचे इन्स्टंट मेसेजिंग ॲप व्हॉट्सॲप आपल्या युजर्सना बिल्ट-इन ट्रान्सलेशन फीचर ऑफर करत आहे. या फीचरच्या मदतीने तुम्ही तुमचा मेसेज समोरच्या व्यक्तीपर्यंत कोणत्याही भाषेत पोहोचवू शकता. म्हणजेच जर तुम्हाला हिंदी भाषा येत असेल. परंतु तुम्हाला इंग्रजी किंवा इतर कोणतीही भाषा जाणणाऱ्या तुमच्या मित्राशी किंवा ऑफिसमधील सहकाऱ्याशी बोलायचे असेल तर तुम्ही ते सहज करू शकता. भाषांतर फीचर वापरण्यासाठी पाहा ही स्टेप बाय स्टेप प्रोसेस.

भाषांतर फीचर वापरण्यासाठी तुम्हाला ही प्रोसेस फॉलो करावी लागेल. तुमचे व्हॉट्सॲप चॅट उघडा आणि एक नवीन मेसेज टाइप करा. आता हा टाईप केलेला मेसेज मेनू येतपर्यंत होल्ड करून ठेवा. आता मेनूमधील 'अधिक' पर्याय निवडा. आता भाषांतर पर्याय निवडा. आता तुमच्या समोर एक पॉप-अप विंडो उघडेल ज्यामध्ये तुम्हाला भाषांतरित मेसेज दिसेल. जर तुम्ही पाठवू इच्छित असलेल्या भाषेत मेसेजेसचे भाषांतर केले नसेल, तर युजर्स त्यांना ज्या भाषेत संदेश पाठवायचा आहे ते निवडू शकतात. तसेच व्हॉट्सॲपने एक नवीन फीचर रोल आउट करण्यास सुरुवात केली आहे. या नवीन फीचरच्या मदतीने युजर्स स्टेटस अपडेट्समध्ये व्हॉइस नोट्सही शेअर करू शकतील. व्हॉईस स्टेटस अपडेट फीचरची माहिती WA BetaInfo या प्लॅटफॉर्मद्वारे देण्यात आली आहे, जी व्हॉट्सॲप वर येणाऱ्या नवीन फीचर्सचा ट्रॅक ठेवते. WA BetaInfo ने ट्विट करून व्हॉट्सॲपमधील या नवीन फीचरचा स्क्रीनशॉटही शेअर केला आहे. WA BetaInfo नुसार, कंपनी सध्या काही बीटा युजर्ससाठी हे फीचर आणत आहे.

क्रोकरी करा चकाचक

प्रत्येक महिलेला वाटते स्वयंपाकघरात काचेची उपकरणे असावीत. क्रोकरीचे आकर्षक प्रकार बाजारात उपलब्ध असल्यामुळे त्याची भुरळ पडल्याशिवाय राहात नाही. डायनिंग टेबलवर स्टायलिश क्रोकरी अधिक शोभून दिसतात. मात्र ही काचेची भांडी बरीच महाग असतात. शिवाय त्यांचा वापर अत्यंत काळजीपूर्वक करावा लागतो. खबरदारी घेतली नाही तर किती सामानाचे नुकसान होण्याची शक्यता असते.

स्वच्छतेबाबतही क्रोकरीची विशेष काळजी घ्यावी लागते. काचेची चमक टिकून राहण्याचे काही वेगळे मार्ग अवलंबावे लागतात. आज यासंबंधी काही महत्त्वाच्या टिप्स जाणून घेऊ या. क्रोकरीवर डाग राहू नये, असे वाटत असेल तर ती वेळच्या वेळी स्वच्छ करायला हवी. फार काळ अस्वच्छ अवस्थेत ठेवल्यास डाग टिकून राहतात आणि स्वच्छ करणे कठीण होते. काचेची भांडी स्वच्छ करण्यासाठी गार पाण्याऐवजी गरम पाण्याचा वापर करावा. गरम पाण्याचा वापर केल्याने साबणाचा कमीत कमी वापर करून ही भांडी स्वच्छ करणे शक्य होते. गरम पाण्यामुळे भांडी स्वच्छ होतातच, शिवाय त्यावरील जीवजंतूंचाही नायनाट होतो. क्रोकरी स्वच्छ केल्यानंतर काही काळ व्हिनेगर मिसळलेल्या पाण्यात बुडवून ठेवावी. काही वेळाने बाहेर काढून न धुताच भांडी सुकवावी. यामुळे क्रोकरीची चमक टिकून राहते. काचेची भांडी धुतल्यानंतर त्यावर लिंबू रगडावे. लिंबामुळे न दिसणारे डागही निघून जातात आणि वेगळी चमक येते. लिंबू चोळण्यानंतर भांडी परत एकदा धुवून घेण्यास विसरू नये. क्रोकरीच्या आतल्या कडा स्वच्छ करण्यासाठी जुन्या ब्रशवर टूथपेस्ट घ्यावी आणि त्याने हलक्या हाताने स्वच्छता करावी. त्यानंतर कोमट पाण्याने भांडी धुवून घ्यावी.

फीट आणि योग्य : बूट हुशारीने निवडा!

चप्पल आपल्याला संरक्षण देतात आणि ती एक फॅशन ॲक्सेसरीही आहे. अनेकदा चुकीचे फुटवेअर वापरले जातात, तेव्हा त्याचे शरीरावरील परिणाम समजून घेतल्याने आणि योग्य बूट निवडल्याने तुमच्या समस्या सुटू शकतात.

हाय हिल्स :

हाय हिल्समुळे पायाच्या चवड्यांवर अतिरिक्त ताण येतो आणि त्यामुळे वेदना तसेच कॉलोसाइट्सचा त्रास होतो. त्यांच्यामुळे आपले घोटेही मुरगळू शकतात. हाय हिल्सचा दीर्घकाळ वापर केल्यामुळे पोटरीचे स्नायू लहान होऊ शकतात आणि पायात वेदना होतात. ते गुडघे, नितंब आणि मणक्यांवर अतिरिक्त ताण आणतात. त्यामुळे इतर समस्या उद्भवू शकतात. नियमित वापरासाठी २ इंचापेक्षा जास्त हिल्स वापरणे टाळा.

फूटवेअर आणि गुडघ्याचे ऑस्टिओआर्थरायटिस :

तुम्हाला गुडघ्याच्या वेदना किंवा आर्थरायटिसचा त्रास असल्यास कठीण किंवा टणक बूट आणि हाय हिल्स घालणे टाळा. संशोधनातून असे दिसून आले आहे की, कमी हिल्सचे लवचिक फूटवेअर (०.५ इंच) गुडघ्यांवरील ताण कमी करते.

फूटवेअर आणि मधुमेह :

दीर्घकाळ मधुमेह असल्यामुळे नसांचे नुकसान होऊ शकते. त्यामुळे पायात बधीरपणा येतो. त्याचा परिणाम म्हणून आपल्याला पायात कापलेले किंवा पुरळ आलेले जाणवत नाही आणि ते वेगाने गंभीर संसर्गात परावर्तित होऊ शकते. पायांची नियमित तपासणी करून लालसरपणा, पुरळ किंवा कापलेले असलेले तपासल्यास आणि खास मऊ फूटवेअरचा वापर केल्यास मधुमेहींमध्ये गंभीर गुंतागुंत टाळता येऊ शकते.

फीट

नवीन फूटवेअर खरेदी करताना तुमच्या पायांची लांबी आणि रुंदी मोजून घ्या. कारण, काळानुसार तुमच्या पायांचा आकार बदलू शकतो. तुम्ही पायाचा आकार संध्याकाळी मोजला पाहिजे, कारण दिवस संपताना पाय थोडासा सुजतो. तुमचे अंगठ्याचे बोट आणि बुटाचे टोक यांच्यामध्ये साधारण अर्धा इंच जागा असली पाहिजे. तुमच्या पायाचा सर्वात मोठा भाग बुटामध्ये घट्ट बसला किंवा चिमटला जायला नको. तुमचे बूट पायापेक्षा लहान असल्यास तुमच्या टाचेला त्रास होऊ शकतो. निमुळत्या फूटवेअरमुळे कॉर्न किंवा बुनियन्स होऊ शकतात. बूट खूप मोठे असल्यास घसरल्यामुळे पुरळ आणि वेदना होऊ शकतात.

योग्य फूटवेअरचा वापर

फील :

तुम्हाला चपलेत आरामदायी वाटले पाहिजे. आरामदायीपणा तपासण्यासाठी स्टोअरमध्ये नवीन चप्पल घालून चाला. तुमचा पाय जमिनीवर आपटतो तेव्हा त्याचा परिणाम कमी करण्यासाठी बुटाला पुरेशा प्रमाणात कुशन असले पाहिजे. लक्षात ठेवा, बूट तुमच्या पायानुसार असावेत, पाय बुटांप्रमाणे जुळवू नका.

फ्रेमवर्क :

चौरस किंवा गोल टो-बॉक्स असलेले बूट निवडा. टोकदार टो-बॉक्स असल्यास तुम्हाला कॉर्न, कॅलॉसाइटिस, बुनियन्स, टाचेतील नादुरुस्ती आणि पुरळ यांचा त्रास होऊ शकतो. बुटाची पुढची बाजू तुमच्या पायाच्या पुढच्या बाजूशी जुळती असावी. हील काऊंटर (बुटाची मागची बाजू) इतकी मजबूत असावी की, पाय मुरगळणार नाही आणि तुमच्या घोट्याला सपोर्ट मिळेल.

बूट बदलण्याची वेळ कधी :

तुमचे बूट खूप घासलेले असल्यास, तुमच्या घोट्याकडेही घासलेले असल्यास ते घर्षण आणि वापराचे परिणाम किंवा चिन्ह आहेत आणि ती तुमचे बूट बदलण्याची वेळ आहे. शेवटी, उद्दिष्टित कार्यासाठी योग्य बुटांचा वापर करा. स्टाईलसाठी आरामदायी-पणाशी तडजोड करू नका.

मधाचे फेसपॅक

मध हे आपल्या आरोग्यासाठी औषधी आहे. मध हे आपल्या त्वचेवरही गुणकारी असल्याचे सिद्ध झाले आहे. बाजारात आलेले केमिकलयुक्त फेसपॅकमुळे आपल्या त्वचेवर विपरित परिणाम होत असतो. मधाचा फेसपॅक घरच्या घरी तयार करून आपली त्वचेचा सतेजपणा कायम ठेवता येऊ शकतो.

मुलतानी मातीचे पावडर, गुलाबजल, मध (शहद) व संत्र्याचा रस प्रत्येक एक-एक चमचा घेऊन त्याची पेस्ट तयार करून रात्री झोपण्याआधी चेहऱ्यावर लावावी. १० ते १५ मिनिटांनी चेहरा स्वच्छ करावा.

एक चमचा मधात एका अंड्याच्या बलक घालून चेहऱ्यावर लावावा. १० मिनिटानी चेहरा स्वच्छ करावा.

पिकलेल्या केळीचा गर, कणीक व एक मोठा चमचा मध यांची पेस्ट चेहऱ्यावर लावावी. १० मिनिटांनंतर चेहरा थंड पाण्याने स्वच्छ करावा.

सतत जांभया येत आहेत का?
मग त्यामागे असू शकतात ही कारणे

वारंवार जांभया येत असतील तर झोप अपुरी झाली असल्याचे हे लक्षण असल्याचे आपण मानतो. मात्र केवळ झोप अपुरी झाली असली तरच सतत जांभया येतात असे नाही. यामागे अन्य काही कारणेही असू शकतात. ही कारणे जाणून घेऊ या. सातत्याने येणाऱ्या जांभया हे मानसिक तणावाचे लक्षण असू शकते. मानसिक तणाव जास्त असेल, तर त्याचा परिणाम मेंदूच्या सक्रियतेवरही होत असतो. त्यामुळे मेंदूला सक्रिय ठेवण्यासाठी प्राणवायूचा पुरेसा पुरवठा होण्यासाठी वारंवार जांभया येऊ लागतात. मेंदूला प्राणवायूचा पुरवठा कमी होत असेल तर याचा परिणाम फुफ्फुसांच्या कार्यावरही होतो. यादरम्यान फुफ्फुसांमध्ये प्राणवायूची मात्रा कमी होऊन कार्बन डाय ऑक्साईडचे प्रमाण वाढले, तर हा वायू कमी करून प्राणवायूची पातळी वाढवण्यासाठी देखील आपल्याला जांभई येते. जांभई आल्याने मेंदूमधील प्राणवायूचा पुरवठा झपाट्याने वाढतो आणि फुफ्फुसांमध्ये साठून राहिलेला कार्बन डाय ऑक्साईड बाहेर पडण्यास मदत होते. जेव्हा शारीरिक थकवा अधिक असेल त्यावेळी शरीराला प्राणवायूचा पुरसा पुरवठा होत नसतो. अशा वेळी देखील सतत जांभया येत असतात. जांभईद्वारे शरीराला आणि स्नायूंना पुरेसा प्राणवायूचा पुरवठा होत असतो. त्यामुळे आपल्याला सातत्याने जांभया येत असल्यास शारीरिक थकवा आला असल्याचे ओळखून काही काळ विश्रांती घ्यावी.

पाठदुखी, कंबरदुखीने हैराण?
मग जमिनीवर झोपून पहा

आजकाल तरुण वर्गातही पाठदुखी, कंबरदुखी, मणक्याच्या वेदना, श्वास घेण्यास त्रास असे विकार वाढत चालले आहेत. सुखासीन जीवनशैली आणि व्यायामाचा अभाव ही कारणे त्यामागे आहेत तसेच रोजच्या आयुष्यात वाढलेले ताणतणाव ही त्याला हातभार लावत आहेत. आपल्या वापरत असलेल्या मऊ मुलायम गाद्या हे विकार अधिक वाढवतात असे निरीक्षण नोंदवले गेले आहे.

मऊ गाद्या, उशा सुखद वाटल्या तरी पाठीची दुखणी, स्वास्थ्यासाठी त्या चांगल्या नाहीत असे तज्ज्ञ सांगतात. मणक्याचे विकार दूर ठेवायचे असतील तर जमिनीवर सतरंजी अथवा पातळ चटई टाकून त्यावर जमिनीला पाठ लावून झोपणे खूपच उपयुक्त ठरते. अशा विश्रांतीचे अनेक फायदे होतात. पहिले म्हणजे जमिनीला पाठ लावून झोपण्याने पाठीचा कणा योग्य स्थितीत राहतो. उशी न घेता झोपले तर श्वास घेण्यास होत असलेला त्रास दूर होतो.

एखाद्या रात्री झोप येत नसेल तर अशा प्रकारे जमिनीवर झोपून पहा, शांत झोप येते.

खांदे, कुल्ले या ठिकाणी वेदना होत असतील तर जमिनीवर झोपण्याने त्या हळूहळू कमी होत जातात. पाठदुखीचा त्रास कमी होतो. गादीवर झोपल्याने शरीराचे तापमान वाढते, त्यामुळे शरीरात उष्णता वाढते. चटई अथवा सतरंजी घालून जमिनीवर झोपल्यास हा त्रास होत नाही, शिवाय रक्तप्रवाह सुरळीत राहतो आणि मेंदू शांत राहतो. स्नायूंना आराम मिळतो. रोज जमिनीवर झोपणे शक्य नसेल तर जेव्हा जेव्हा पाठदुखी, कंबरदुखी व वरील कोणते त्रास होतात तेव्हा काही दिवस तरी जमिनीवर झोपावे, असे सांगितले जाते.

ठाण्यातील २०७५ कुटुंबांच्या वास्तव्यावर पालिकेची कुऱ्हाड
९६ अतिधोकादायक ४,४०७ धोकादायक

■ठाणे : खबरदारीचा उपाय म्हणून दरवर्षी ठाणे महापालिका शहरातील अतिधोकादायक आणि धोकादायक इमारतींना नोटीस बजावत असते. यावर्षी देखील दरवर्षीप्रमाणे पावसाळ्यापूर्वीच महापालिकेने धोकादायक आणि अतिधोकादायक इमारतींची यादी जाहीर केली आहे. ठाणे शहरात ९६ अतिधोकादायक तर ४ हजार ४०७ इमारती या धोकादायक ठरल्या आहेत. त्यानुसार अतिधोदायक या इमारतीत वास्तव्यास असलेल्या २०७५ कुटुंबांना या नोटीस प्रभाग समितीनिहाय बजावल्या जात आहेत अतिधोकादायक इमारतीमध्ये वास्तव्यास असलेल्या रहिवाशांना इमारती रिकाम्या करण्यास सांगितले जाणार आहे. इमारती रिकाम्या झाल्यावर पालिका त्यावर तोडक कारवाई करीत असते. त्यानुसार आता शहरातील ९६ अतिधोकादायक इमारतधारकांना महापालिकेच्या अतिक्रमण विभागामार्फत इमारती रिकाम्या करण्याची नोटीस बजावण्यास सुरुवात झाली आहे. त्यानुसार या इमारतीत वास्तव्यास असलेल्या २०७५ कुटुंबांना या प्रभाग समितीनिहाय नोटीस बजावल्या जात आहेत.

ठाणे महापालिकेने शहरातील धोकादायक आणि अतिधोकादायक इमारतींची यादी तयार केली आहे. त्यानुसार शहरात ९६ इमारती अतिधोकादायक यादीत येत असून त्या इमारती खाली करून त्या पाडण्याची कारवाई पालिकेने सुरू केली आहे. पुढे जाऊन आता ज्या इमारती अतिधोकादायक असून त्या इमारती रिकामी करण्यात आलेल्या नाहीत, अशा इमारतधारकांना पालिकेने नोटीस बजावण्यास सुरुवात केली आहे. येथील इमारतधारकांनी पयार्यी व्यवस्था पहावी, असे आवाहनही पालिकेमार्फत करण्यात आले आहे.

वागळे इस्टेट, मुंब्रात सर्वाधिक इमारती

अतिधोकादायक इमारतींमध्ये सर्वाधिक ६३ इमारती या एकट्या नौपाडा प्रभाग समितीत आहेत, तर सी २ ए या प्रकारातही येथ २१ इमारतींचा समावेश आहे. दुसरीकडे वागळे इस्टेट भागात १०८८ इमारती या धोकादायक इमारती असल्याची आकडेवारी समोर आली आहे. त्यातही मुंब्रात अतिधोकादायक आणि धोकादायक इमारती या १३४३ एवढ्या आहे. त्यानुसार ज्या अतिधोकादायक इमारती आहेत, त्या रिकाम्या करण्याची कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे. ९६ पैकी २५ इमारती व्याप्त असून त्या रिकाम्या करण्याचे कसब पालिकेला दाखवावे लागणार आहे. या वाणिज्य १५१ दुकाने असून ५४७ कुटुंब आणि इमारतीत राहणाऱ्या कुटुंबाची संख्या २०७५ एवढी आहे.

चार टप्प्यांत वर्गीकरण

ठाणे महापालिका क्षेत्रातील धोकादायक इमारतींचे सी-१, सी-२ ए, सी-२बी आणि सी-३ अशा चार टप्प्यांत वर्गीकरण केले आहे. सी-१ म्हणजे राहण्यास अयोग्य आणि तत्काळ निष्कासित करावी लागणारी अतिधोकादायक इमारत, सी-२ ए म्हणजे इमारत रिकामी करून संरचनात्मक दुरुस्ती करणे, सी-२ बी म्हणजे इमारत रिकामी न करता त्याची संरचनात्मक दुरुस्ती करणे आणि सी-३ म्हणजे इमारतींची किरकोळ दुरुस्ती करणे.

मागील वषार्पेक्षा यंदाचा आकडा अधिक

शहरात ९६ इमारती या अतिधोकादायक यादीत येत असून त्या इमारती खाली करून त्या पाडण्याची कारवाई पालिकेने सुरू केली आहे. त्यातील २५ इमारती या आजच्या घडीला व्याप्त आहेत. तसेच १५ इमारतीवर तोडक कारवाई करण्यात आली असून १० इमारतींचे धोकादायक बांधकाम काढलेले आहे. धोकादायक इमारतींमध्ये ४ हजार ४०७ इमारतींचा समावेश आहे. मागील वषीर्पेक्षा यंदा अतिधोकादायक इमारतींची संख्या ही १० ने तर धोकादायक इमारतींची संख्या ही ११० ने वाढली आहे.

क्लस्टरच्या नावाखाली ठाणे बिल्डरांच्या घशात घालण्याचा डाव : जितेंद्र आव्हाड

■ठाणे : क्लस्टर म्हणजे ठाणे बिल्डरांच्या घशात घालण्याचा डाव असल्याचा आरोप आ. जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे. लँडबँकच्या माध्यमातून बिल्डर्स आपला ॲसेट व्हॅल्यू (भांडवली मूल्य) वाढवितात अन् ॲसेट व्हॅल्यू (भांडवली मूल्य) वाढवून स्वतःच्या धन निर्मितीसाठी त्याचा फायदा करून घेतात. त्यास ठाणे महानगर पालिकेकडून हातभार लावला जात आहे. ठाणे महानगर पालिकेचे जे काम नाही ते काम महानगर पालिका विशेष रूची घेऊन करीत आहे. असा गंभीर आरोप राष्ट्रवादीचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी समाजमाध्यमांद्वारे केले आहेत. शहरात पाणी नाही, शहरातील कचरा उचलला जात नाही. शहरातील महत्वाचे रस्ते खोदून ठेवले आहेत. अनधिकृत बांधकामांचा सुळसुळाट झाला आहे. याकडे लक्ष न देता, म्हाडाच्या जमिनी कशा ताब्यात घ्यायच्या, यासाठी पत्रव्यवहार सुरू आहेत. गोरगरीबांनी आपल्या पक्क्या घरांची स्वप्ने ज्या एसआरएच्या माध्यमातून पाहिली, त्या एसआरएला देखील गेली अनेक वर्षे कपाटात बंद करून ठेवली आहे अन सगळे डोळे फक्त क्लस्टरकडे लावले आहेत, असाही आरोप त्यांनी केला आहे. क्लस्टर का व कशासाठी, हा प्रश्न अद्यापही अनुत्तरीत आहे. दोन कुठल्या तरी बिल्डर्सना, जे भारतातील श्रीमंतांच्या यादीत पहिल्या शंभरमध्ये आहेत. त्या बिल्डर्सला पहिल्या २० मध्ये आणण्यासाठी ठाणे महानगर पालिका त्यांना मदत करीत आहे. ठाणे महानगर पालिकेचे जे काम आहे ते करीतच नाहीत. मात्र गोरगरीबांची घरे उद्धवस्त करण्याचे काम अगदी रस घेऊन करीत आहेत. हे करतात कोणासाठी नेमके? कोण आहेत ते बिल्डर्स, ज्यांच्यासाठी हा कट रचला जातोय. ठाण्याच्या मध्यवर्ती भागात सध्या कोणाची कामे चालू आहेत? कोणी मोठ्या - मोठ्या जमिनी विकत घेतल्या आहेत? त्या बिल्डर्सची नावे फुटणारच आहेत असेही त्यांनी सांगितले.

आदिवासी बांधवांची पालिकेवर धडक, रिकामी मडकी डोक्यावर घेऊन केला निषेध

■ठाणे : घोटभर पाण्यासाठी शहरातील आदिवासी पाड्यातील रहिवाशांनी रिकामी मडकी हंडी घेऊन ठाणे महापालिकेच्या प्रभाग कार्यालयांवर धडक दिली. घोडबंदर परिसरातील १३ आदिवासी पाड्यांना सध्या तीव्र पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. येथील पाडे तहानलेले असून येथील रहिवाशांना पाणी मिळावे, या मागणीसाठी बुधवारी श्रमजीवी संघटनेच्या माध्यमातून महापालिकेच्या माजिवडा - मानपाडा प्रभाग समितीवर मोर्चा काढण्यात आला होता. यावेळी आदिवासी महिलांनी डोक्यावर रिकामी मडके आणि हंडे घेऊन पालिका प्रशासनाचा निषेध केला.

बुधवारी भर उन्हात आदिवासी बांधव प्रभाग समिती कार्यालयावर धडकले होते. त्यानंतर सांयकाळी पाचपर्यंत त्यांनी येथे ठिय्या मांडला होता. मागील कित्येक वर्षांपासून घोडबंदर भागातील पानखंडा, बाबनोली पाडा आदींसह इतर १३ आदीवासी पाड्यांना पाण्याची समस्या भेडसावत आहे. वनविभागाच्या हद्दीत येथील पाडे असल्याने त्यांना पाणी देत येत नसल्याचे महापालिकेचे म्हणणे आहे. त्यात येथे असलेल्या बोअरवेलला देखील आता पाणी कमी झाले आहे. त्यामुळे या भागात मोठ्या प्रमाणात पाणीटंचाई उद्भवल्याचे म्हटले जात आहे. यंदा उन्हाची झळ मार्च आणि एप्रिल महिन्यापासूनच बसण्यास सुरुवात झाल्याने आगामी मे आणि जून महिन्यात पाण्यासाठी हाल होऊ नयेत, या उद्देशाने हा मोर्चा काढण्यात आला होता. यावेळी प्रभाग समितीचे उपायुक्त दिनेश तायडे यांना श्रमजीवीच्या वतीने निवेदन देखील देण्यात आले आहे. यावेळी महिलांनी डोक्यावर मडके आणि हातात रिकामी हंडे घेऊन भर उन्हात हे आंदोलन केले.

तीव्र आंदोलनाचा इशारा

प्रत्येक कुटुंबाला त्याच्या राहत्या घरात पाण्याचे नळ तातडीने मंजूर करून पाणीटंचाई मुक्त गावपाडे करण्यास कालबद्ध कार्यक्रम ठरविण्यात यावा, जागेचा अडथळा निर्माण होत असल्या ठिकाणी पाणी बोअरवेल मारून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, सुरू असलेल्या पाणी पाइपलाइनला वाढीव नळ जोडणी करण्यात येऊ नये, ज्या भागात जलवाहीन्या लहान आहेत, त्यांची क्षमता वाढवून पाणीपुरवठा करण्यात यावा, या मागण्या मान्य झाल्या नाहीत तर येत्या काळात आणखी तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशारा यावेळी श्रमजीवीच्या माध्यमातून देण्यात आला.

इंग्रजीचीसक्ती करणाऱ्या शाळांवर कारवाई होणार
मनसेच्या तक्रारीनंतर शिक्षण विभागाने घेतली दखल

■ठाणे : ठाणे जिल्ह्यातील काही इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना मराठीत बोलण्यास मनाई केल्याचा गंभीर प्रकार समोर आला होता, यावर मनविसेचे सरचिटणीस संदीप पाचंगे यांच्या वतीने शिक्षण विभागाकडे तक्रार दाखल करण्यात आली होती. यानंतर शिक्षण विभागाने तात्काळ दखल घेत, सर्व शाळांना सक्त आदेश काढले असून, विद्यार्थ्यांना इंग्रजीत बोलण्यास सक्ती केल्यास संबंधित शाळांवर कारवाई करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

इंग्रजी माध्यमातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांवर मराठी भाषेचा वापर न करण्यासाठी दबाव टाकला जात असल्याबाबत मनविसेचे राज्य सरचिटणीस संदीप पाचंगे यांनी मनविसे शिष्टमंडळासह २ एप्रिल रोजी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडे तक्रार सादर केली होती. काही सीबीएसई/ आयसीएसई माध्यमाच्या शाळांमध्ये वर्गात, आवारात आणि उपक्रमांमध्ये मराठीत बोलल्यास विद्यार्थ्यांना अपमानित केल्याचेही सांगण्यात आले होते.

या तक्रारीची गांभीयार्ने दखल घेत प्राथमिक शिक्षणाधिकारी बाळासाहेब राक्षे यांनी अधिकृत आदेश काढला. या आदेशानुसार ठाणे जिल्ह्यातील सर्वच प्राथमिक, माध्यमांच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी मराठीतून संवाद साधावा, असे स्पष्ट करण्यात आले आहे. फक्त मराठी विषयापुरते भाषेचे शिक्षण न देता, इतर सर्व उपक्रमांमध्येही विद्यार्थ्यांनी मराठीचा वापर करावा, असे आदेशात नमूद आहे.

शाळांमध्ये मराठी ही अध्यापनाची अनिवार्य भाषा असून, तिचा वापर रोजच्या संवादात, चर्चासत्रात, नाट्य व भाषण स्पर्धांमध्ये तसेच सामाजिक उपक्रमांमध्ये होणे आवश्यक आहे. परंतु काही शाळा या निर्णयाला डावलून विद्यार्थ्यांना इंग्रजी बोलण्यास प्रवृत्त करत आहेत. याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्यावर मानसिकतेवर होत असून विद्यार्थ्यांचा मातृभाषेबाबतचा आत्मविश्वास गमविण्याची वेळ येत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. विद्यार्थ्यांनी गणित, विज्ञान, इतिहास यांसारखे विषय इंग्रजीतून शिकले तरी संवादासाठी मराठी भाषा आवश्यक आहे, असे मनविसेच्या निवेदनात म्हटले होते.

"शिक्षण विभागाच्या परिपत्रकानंतर आता इंग्रजी माध्यमाच्या शाळांनाही मराठी भाषेचा आदर ठेवत शाळेतील संवादात तिचा समावेश करणे बंधनकारक असेल. हा निर्णय केवळ तक्रारीपुरता मर्यादित न राहता, राज्यभरात मातृभाषेला स्थान देण्याच्या दृष्टीने एक सकारात्मक पाऊल ठरत असून, शिक्षण क्षेत्रातील भाषिक असंतुलन रोखण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरेल."

-संदीप पाचंगे, मनविसेचे राज्य सरचिटणीस

"ठाणे-भिवंडी-कल्याण मेट्रो-५च्या कामाचा ऐतिहासिक टप्पा पूर्ण" : एमएमआरडीए

■ठाणे : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने ठाणे-भिवंडी-कल्याण या मुंबई मेट्रो लाईन ५ च्या (पहिला टप्पा) अंतर्गत मध्य रेल्वेच्या वसई-दिवा मार्गावर अंजुरफाटा, भिवंडी येथे ६५ मीटर लांबीचा ''ओपन वेब गर्डर'' यशस्वीरित्या बसवण्याची महत्त्वपूर्ण कामगिरी पार पाडली आहे. त्यानंतर, 'मुंबई मेट्रो लाईन-५ च्या कामाचा ऐतिहासिक टप्पा पूर्ण', अशी सोशल मीडिया पोस्ट करीत एमएमआरडीएने याबाबत अधिकृत माहिती दिली.

कठीण अभियांत्रिकी कामगिरी यशस्वी

एमएमआरडीएने दिलेल्या माहितीनुसार, ४५६ मेट्रिक टन वजनाच्या गर्डरच्या लाँचिंगसाठी तीन टप्पे आखण्यात आले होते. ठाणे-भिवंडी रोड, वसई-दिवा रेल्वे मार्ग आणि २० मीटर उंचीवरील मेट्रो व्हायाडक्ट अशा तीन पातळ्यांवरील क्लिष्ट परिस्थितीत हे काम पार पाडले गेले. अचूक नियोजन, अभियांत्रिकी कौशल्य आणि यंत्रणांचा समन्वय हे यशाचे प्रमुख घटक ठरले आहेत.

ठाणेझभिवंडीझकल्याण मेट्रो दरम्यान १५ स्थानके

मुंबई मेट्रो मार्ग- ५ ठाणे-भिवंडी-कल्याण हा १५ स्थानके असलेला २४.९० किमी लांबीचा एलिव्हेटेड कॉरिडॉर आहे. मेट्रो ५ महत्त्वाचा मार्ग असून सध्या सुरू असलेल्या मेट्रो मार्ग-४ (वडाळा ते कासारवडवली) आणि प्रस्तावित मेट्रो मार्ग-१२ (कल्याण ते तळोजा) आणि मध्य रेल्वे यांच्यात परस्पर एकीकरण साधण्यात येईल. व्यावसायिक व शासकीय कर्मचारी तसेच ठाणे, भिवंडी व कल्याण परिसरात राहणाऱ्या नागरिकांसाठी हा मेट्रो मार्ग उपयुक्त ठरणार आहे.

प्रकल्पाला मिळणार वेग

हा टप्पा पूर्ण झाल्यामुळे मेट्रो लाईन-५ च्या उर्वरित कामांना वेग मिळणार आहे, असे एमएमआरडीएने स्पष्ट केले. संपूर्ण प्रकल्प नियोजित वेळेत पूर्ण केला जाईल, असा विश्वासही व्यक्त करण्यात आला.

साखरपुड्यामध्ये नवरीने प्रियकराला मारली मिठी
लग्नाच्या दिवशीच इन्कम टॅक्स अधिकाऱ्याची आत्महत्या

■नाशिक : नाशिकमध्ये प्राप्तिकर विभागाच्या अधिकाऱ्याने आत्महत्या केल्याने खळबळ उडाली आहे. अधिकाऱ्याच्या साखरपुड्यात त्याच्या होणाऱ्या पत्नीने आपल्या कथित प्रियकराला मिठी मारली होती. यानंतर तिचं प्रेमप्रकरण उघड झालं होतं. यामुळे अधिकारी नैराश्यात गेला होता. त्यातच तरुणीने लग्न करण्यासाठी ब्लॅकमेल करण्यास सुरुवात केली होती. यामुळे अधिकाऱ्याने लग्नाच्या दिवशीच टोकाचं पाऊल उचलत आत्महत्या केली.

हरेकृष्ण पांडे नाशिकमधील आयकर कार्यालयात अधिकारी म्हणून कार्यरत होते. त्यांचं उत्तर प्रदेशातील वाराणसी येथील एका तरुणीसह लग्न ठरलं होतं. वाराणसीतच त्यांचा साखरपुडा झाला होता. या साखरपुड्याच्या कार्यक्रमात नवरीने आपल्या कथित प्रियकराला सर्वांसमोर मिठी मारली होती. यामुळे तिचे प्रेमसंबंध उघड झाले. यामुळे हरेकृष्ण पांडे मानसिक तणावात आले होते.

यानंतर हरेकृष्ण पांडे लग्न करण्यास नकार देत होते. यामुळे तरुणीने त्यांना ब्लॅकमेल करण्यास सुरुवात केली. ''लग्न कर नाहीतर हुंडा प्रकरणात अडकवेन,'' अशी धमकी तिने दिली होती. सतत होणारं ब्लॅकमेलिंग आणि मानसिक त्रासाला कंटाळून अखेर हरेकृष्ण पांडे यांनी आत्महत्या केली. नाशिकच्या उत्तमनगर परिसरात त्यांनी गळफास लावून घेतला. याप्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान या घटनेनंतर नाशिकमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

पोलिसांनी काय सांगितलं?

''हरेकृष्ण पांडे इन्कम टॅक्स अधिकारी होते. ते इन्कम टॅक्स कॉलनीत राहत होते. त्यांचे वारणासी येथील त्यांच्या मूळगावी मोहिनी नावाच्या मुलीसोबत साखरपुडा झाला होता. पण मुलीचे प्रेमसंबंध असल्याने आणि ती यांना मानसिक त्रास देत असल्याने तणावात जाऊन आत्महत्या केली. त्यांनी गळफास लावून जीवन संपवलं आहे. त्यांच्या लग्नाची तारीखही ठरली होती. हरेकृष्ण यांचे भाऊ हरेराम यांच्या तक्रारीवरून आम्ही नवरीसह तिचा कथित प्रियकर आणि अन्य संशयिताविरोधात अंबड पोलीस ठाण्यात आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी केली जाईल,'' असं वरिष्ठ पोलीस निरीक्षक राकेश हांडे यांनी सांगितलं.

प्रसिद्ध न्युरोसर्जन डॉ. शिरीष वळसंगकर यांनी स्वतःवर गोळी झाडत संपवलं आयुष्य

■सोलापूर : सोलापुरातील प्रसिद्ध न्युरोसर्जन डॉ. शिरीष वळसंगकर यांनी स्वतःवर गोळी झाडून घेत जीवन संपवलं. डॉ. शिरीष वळसंगकर यांनी अज्ञात कारणावरुन शुक्रवारी रात्री ८.३० च्या सुमारास स्वतःच्या घरात असताना डोक्यात गोळी झाडून घेतली. यानंतर गोळीचा आवाज येताच बेशुद्धवस्थेत असलेल्या डॉ. वळसंगकर यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं.

डॉ. शिरीष वळसंगकर हे अत्यंत गंभीररित्या जखमी असल्यानं यांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली. वळसंगकर हे अत्यंत प्रसिद्ध न्युरोसर्जन होते. फक्त सोलापूर, महाराष्ट्रचं नाही तर जगभरात त्यांनी विविध रुग्णालयात त्यांनी वैद्यकीय सेवा बजावली आहे. त्यांनी हे टोकाचं पाऊले का उचललं याचं कारण अद्याप समोर आलेलं नाही. ज्या हॉस्पिटलमध्ये डॉ. शिरीष वळसंगकर यांनी हजारो रुग्णांवर उपचार केलं त्यांच्या त्याचं रुग्णालयात त्यांनी शेवटचा श्वास घेतला.

डॉ. शिरीष वळसंगकर यांची ओळख...

वैद्यकिय क्षेत्रात नामवंत न्युरोसर्जन अशी डॉ. शिरीष वळसंगकर यांची ओळख. ते सोलापुरातील पहिले न्युरोलॉजिस्ट असून, मेंदूवरील विविध आणि अत्याधुनिक उपचारांसाठी त्यांनी इथं अत्याधुनिक सोयीसुविधांनी परिपूर्ण असं रुग्णालय सुरू केलं होतं. न्यूरोलॉजी क्षेत्रात त्यांनी दिलेलं भरीव योगदान अनेकांना जगण्याची नवी उर्जा देणारं ठरलं. मात्र याच डॉ. शिरीष वळसंगकर यांच्या आत्महत्येमुळं अनेकांच्याच पायाखालची जमीन सरकली आहे. राहत्या घरी त्यांनी हे टोकाचं पाऊल उचलल्यानंतर कुटुंबीयांच्या ही बाब लक्षात येताच त्यांनी डॉक्टरांना ताडकीनं रुग्णालयात नेलं. पण, उपचारांदरम्यानच त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

एका महिन्याच्या मुलीला विहिरीत फेकून हत्या... आई-वडिलांनी सांगितलेलं कारण त्याहूनही धक्कादायक

■पनवेल : एका महिन्याच्या मुलीला विहिरीत फेकून देऊन तिची हत्या करणाऱ्या आई, वडिलांना जालन्यातील चंदनझिरा पोलिसांनी अटक केली आहे.१२ एप्रिल रोजी एका महिन्याच्या मुलीला विहिरीत फेकून देऊन तिची हत्या केल्याची घटना उघडकीस आली होती. चिमुकलीची हत्या का केली, यामागचं कारणही तितकंच धक्कादायक आहे.

आई-वडील देवासमान असतात असं आपण मानतो. मात्र जालन्यात एक हृदय पिळवटून टाकणारी घटना घडली आहे. जन्मदात्या मायबापानंच आपल्या पोटच्या एका महिन्याच्या चिमुरडीला विहीरीत फेकून देऊन तिची हत्या केली. सतीश पवार आणि पुजा पवार अशी या दाम्पत्याची नावं आहेत. आपल्या पोटच्या गोळ्याला या क्रूर दाम्पत्यानं विहीरीत फेकून दिलं. त्यानंतर ती मृतावस्थेत आढळली. तपासानंतर या क्रूर आई-वडिलांविरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली आहे.

ज्यादिवशी या लहान मुलीच्या हत्येची घटना घडली. त्या दिवशी या परिसरात यात्रा होती. यात्रा असल्यानं भक्तांची गदीर्ही होती. याच गदीर्चा फायदा घेत मुलीचे वडील सतीश पवारनं मुलीला विहिरीत फेकून तिची हत्या केल्याचं तपासात समोर आलं. आरोपींच्या चौकशीदरम्यान या जोडप्याला ४ मुली होत्या. पण प्रत्यक्षात त्यांना सध्या एकच मुलगी असल्याचं समोर आलं आहे. याआधीही या जोडप्यानं एक मुलगी ८ महिन्याची असताना तिची हत्या केल्याची प्राथमिक माहिती पोलिसांच्या हाती लागली आहे. तर इतर दोन मुलींचं काय झालं याबाबत देखील पोलीस तपास करत आहेत. सतत मुलीच होत असल्यानं या माता-पित्यानं एका महिन्याच्या मुलीला संपवल्याचं पोलीस तपासात समोर आलं आहे.

या घटनेचा तपास करणं पोलिसांसमोर एक आव्हान होतं. या घटनेत कुणीही फिर्यादी नव्हता. त्यामुळे तपास पूर्ण करण्याचं आव्हान पोलिसांसमोर होतं. तरीही क्लिष्ट तपास सोपा करत पोलिसांनी या प्रकरणात मुलीच्या आई,वडिलांना जेरबंद केलं आहे.

- १२ एप्रिल रोजी विहिरीत मुलीचं पार्थिव मिळाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी पोलिसांची ४ पथकं नेमण्यात आली
- या तपासात पोलिसांनी अंगणवाडी सेविकांची मदत घेतली. मागील तीन महिन्याच्या स्त्री बालिका जन्माच्या नोंदी तत्काळ मागवण्यात आल्या
- या माहितीत जिल्ह्यातील ५० ते ६० गावांमधील 1 हजारांच्या आसपास बाळंत महिलांची माहिती घेण्याचं काम करण्यात आलं
- तसंच अनेक ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेजदेखील मिळवण्यात आले
- हा तपास करत असताना जालना तालुक्यातील गारवाडी तांडा इथं एक महिला एक महिन्यापूर्वी बाळंत झाली होती पण आता तिच्याजवळ बाळ नाही अशी माहिती पोलिसांना मिळाली
- त्यानंतर पोलिसांनी 24 वर्षाच्या पूजा पवार वखारी आणि तिचा पती सतीश पवार यांना ताब्यात घेऊन विचारपूस केली
- या चौकशीत दोघांनीही स्वतःच्या एका महिन्याच्या मुलीच्या हत्येची कबुली दिली

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई 400063 (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com